।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ।।

दासराम ग्रंथमाला : पुष्प ६६

# नासदीय सूक्त - विवरण

## (श्रीदासराममहाराजकृत भावार्थावरील विवरण)

— श्री. नारायण रघुनाथ देशपांडे —

■ प्रकाशक ■

श्री. रमेश लाळे | श्री. मोहन बर्वे

श्री. व सौ. अंजली कुलकर्णी | श्री. व सौ. जुई मेणे

आवृत्ती पहिली | सांगली | इ.स.२०१६

■ **प्रकाशक :**

श्री. रमेश गोपाळराव लाळे
पुष्पज्योती अपार्टमेंट, फ्लॅट नं. ३
विश्रामबाग, सांगली – ४१६ ४१५.
फोन (०२३३) २३०१८५०

■ **पुस्तक मिळण्याचे ठिकाण :**

श्री. दिपक चंद्रशेखर केळकर
घर नं. ८२७, श्रीरामनिकेतन
श्री. बापुरावजी केळकर वाडा,
गांवभाग, सांगली. ४१६४१६.
फोन (०२३३) २३३२४६२

■ **प्रथम आवृत्ती :** इ.स. २०१६

■ **प्रकाशन दिन :**

माघ शुध्द तृतीया, गणेशजयंती, शके १९३७
सोमवार, दि. ११/२/२०१६

■ **मुद्रक :**

श्री प्रसाद ग्राफिक्स, तळमजला,
चाफळकर कॉम्प्लेक्स, गावभाग,
सांगली ४१६४१६.

■ **प्रसादमूल्य : रु. ५०/–**

■ **सर्व हक्क प्रकाशकाधीन**

# प्रस्तावना ...

सृष्टिनिर्मितीसंबंधी तात्विक विचार मांडणारे ऋग्वेदामधील 'नासदीयसूक्त' अत्यंत प्रसिध्द आहे. भारतीय तत्वज्ञानामध्ये ह्याला महत्वाचे स्थान आहे. ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील हे १२९ वे सूक्त आहे. या सूक्तात मांडलेल्या मूलभूत तत्वज्ञानाचा पुढे उपनिषदे, भगवत्गीता इत्यादीमधून अधिक विस्तार झालेला दिसून येतो. अशा या सात ऋचांनी बनलेल्या सूक्ताचा अन्वयार्थ प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी लिहिला असून त्यावर सद्गुरु श्रीदासराममहाराज यांनी संप्रदायाला धरून भावार्थ लिहिला आहे. हा ग्रंथ श्रीमामामहाराज केळकर यांचे जन्मशताब्दीनिमित्त २७ फेब्रुवारी १९८८ रोजी प्रसिध्द झाला. यातील अन्वयार्थ व भावार्थावर विवरण लिहिण्यासाठी सद्गुरुंची प्रेरणा झाली आणि त्यातूनच हा ग्रंथ साकार झालेला आहे. अर्थात प. पू. आण्णांचे प्रेमळ आशीर्वाद व प. पू. सद्गुरु श्रीदासराममहाराजांची कृपा यामुळेच हे विवरण शब्दबध्द होऊ शकले आहे याबद्दल माझ्या मनात तिळमात्रही शंका नाही.

नासदीय सूक्त हे गूढ रहस्य असलेले लिखाण आहे. सामान्य माणसाला त्याचे आकलन होणे अवघड आहे. श्रीदासराममहाराजांनी या रहस्याचा भेद करून सामान्य माणसाला समजेल अशा शब्दात त्याची मांडणी केलेली आहे. त्यांनी केलेल्या भावार्थाची दोन प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील. श्रीदासराममहाराजांनी केवळ तर्काच्या सहाय्याने शब्दार्थाचा वेध घेऊन हा भावार्थ लिहिलेला नसून त्यामध्ये अभिप्रेत असलेला महत्वाचा आशय मांडलेला आहे. हे केवळ देहबुध्दीतून साकारलेले बौध्दिक पातळीवरील लिखाण नाही. त्यांनी मांडलेल्या तत्वज्ञानाला स्वानुभवाचा भक्कम पाया आहे. आपला चिमड संप्रदाय हा वेदप्रणित आहे. त्याला वेदातील सूक्तांचा आधार आहे. सद्गुरु श्रीदासराममहाराजांनी हे आध्यात्मिक रहस्य आपणा सर्वांकरिता उलगडून दाखविले आहे. त्यामुळे या विषयात प्रवेश करणे शक्य झाले आहे. यामध्ये मांडलेल्या विषयाच्या चिंतनाने आपल्या सर्वांचे साधन अधिक उत्साहाने आणि निश्चयाने होण्याला निश्चितच सहाय्य होणार आहे.

हे विवरण लिहिताना विषय मांडण्याच्या सोयीसाठी चार प्रकरणांमध्ये त्याची विभागणी केलेली आहे. पहिल्या विभागामध्ये ऋग्वेदामधील नासदीयसूक्ताच्या सात ऋचा व त्यावरती प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी केलेला अन्वयार्थ दिलेला आहे. प्रकरण २ ते ४ मधील विषय पाहताना संदर्भासाठी याचा उपयोग होणार आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये प्रा.डॉ. के. वा. आपटे यांनी केलेल्या अन्वयावरती विवरण केले आहे. या सूक्तावरील लोकमान्य टिळक व शंकर रामचंद्र राजवाडे तथा अहिताग्नि राजवाडे यांनी लिहिलेले भाष्य प्रसिध्द आहे. सद्गुरु श्रीदासराममहाराज यांनी भावार्थ लिहिताना आपली त्यासंबंधीची भूमिका मांडली आहे. त्यामध्ये त्यांनी या दोघांनी केलेल्या भाष्याचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. त्यामुळे अन्वयावरील विवरण लिहिताना प्रामुख्याने लोकमान्य टिळक व अहिताग्नि राजवाडे यांनी केलेल्या भाष्याचा आधार घेतलेला आहे. तिसऱ्या आणि चौथ्या प्रकरणामध्ये सद्गुरु श्रीदासराममहाराजांनी केलेल्या भावार्थावरील विवरण आलेले आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये एक ते सात ऋचांवरील भावार्थाचा अनुक्रमे सारांश घेऊन त्यावरती विवरण असून चौथ्या व शेवटच्या प्रकरणामध्ये साधनेच्या दृष्टिकोनातून मांडलेल्या भावार्थाचा सारांश घेऊन त्यावरती विवरण केलेले आहे. अखेरीस श्रीदासराममहाराजांनी केलेल्या भावार्थाची वैशिष्ट्ये नमूद करण्यात आलेली आहेत.

हे लिखाण प्रसिध्द होण्यासाठी अनेक ग्रंथकर्ते व व्यक्तींचे सहाय्य झाले आहे. पुणे विद्यापीठ, संस्कृत प्रगत अध्यापन केंद्राचे डायरेक्टर डॉ. श्री. रविंद्र मुळे यांच्यामुळे श्री. अहिताग्नि राजवाडे यांनी लिहिलेला 'नासदीय सूक्त भाष्य' हा ग्रंथ उपलब्ध होऊ शकला. तसेच संस्कृतचे प्रख्यात गाढे अभ्यासक प्रा. डॉ. प्र. ग. लाळे, पुणे यांचेही याकामी मार्गदर्शन लाभले

आहे. सद्‌गुरु श्रीदासराममहाराजांच्या अंतरंगातील प्रा. डॉ. के. वा. आपटे म्हणजेच आपटेकाका यांनी अत्यंत मौलिक अभिप्राय या ग्रंथासाठी दिला आहे. श्री. आपटेकाका यांनीच या सूक्ताचा अन्वयार्थ लिहिलेला असल्याने त्यांचा अभिप्राय अत्यंत मोलाचा वाटतो.

माझ्या विनंतीला मान देऊन श्री. अनिलप्रभू केळकर यांनी अभ्यासपूर्ण अभिप्राय दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. ग्रंथ प्रकाशनाची जबाबदारी सद्‌गुरु श्रीदादांच्यावरती अतीव निष्ठा असणारे माझे स्नेही श्री. रमेश लाळे व श्री. मोहन बर्वे तसेच माझ्या कन्या श्री. व सौ. अंजली कुलकर्णी व श्री. व सौ. जुई मेणे यांनी स्वीकारली. या ग्रंथाचे सुबक मुद्रण श्री. व सौ. पटवर्धन यांनी करून दिले. या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

या ग्रंथाच्या वाचनाने त्यातील तत्वज्ञानाचे आकलन व्हावे व त्याच्या रसग्रहणाचा आस्वाद घेण्याची क्षमता प्राप्त व्हावी असा आशीर्वाद श्रीदासराममहाराजांनी आपणा सर्वांना द्यावा अशी त्यांच्या चरणी प्रार्थना करीत आहे. अखेरीस भगवान सद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, प. पू. सद्‌गुरु श्रीमामामहाराज व प. पू. सद्‌गुरु श्रीदासराममहाराज यांचे चरणी अनेक प्रणिपात करून येथेच थांबतो.

श्रीदादांचा चरणरज

सांगली **नारायण**

# प्रकाशकाचे मनोगत ...

॥ राजाधिराज सद्‌गुरुनाथमहाराज की जय॥

सृष्टिनिर्मितीपूर्वी काय होते ? कशी स्थिती होती ? त्यातून सृष्टिनिर्मिती कशी झाली ? याचं कुतुहल, कोडे या पृथ्वीतलावर मानव निर्मिती झाल्यापासून मानवाला पडलेलं आहे. त्याच चिंतनातून प्राचीन ऋषीमुनींना एका विशिष्ट अवस्थेत वेद श्रुत झाले. अशा अपौरुषेय ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील १२९ वे सूक्त हे नासदीयसूक्त म्हणून प्रसिध्द आहे. नासदीयसूक्तामध्ये आलेल्या विषयांचाच विस्तार पुढे उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्रे व दर्शन ग्रंथांतून झाला आहे. विश्वनिर्मिती या गूढ व व्यापक विषयावरचे, नासदीयसूक्त हे चिंतन आहे. 'ते एकले एक' (तत् एकम्) स्वशक्तीने वायूशिवाय श्वासोच्छ्वास करत होते'. या 'तत् एकम्' तत्वालाच पुढे भारतीय ऋषीमुनींनी 'ब्रह्म' ही संज्ञा दिली.

असे हे नासदीयसूक्त अत्यंत महत्वाचे व मूलगामी असल्याने डॉ. के. वा. आपटे यांनी प. पू. श्रीदासराममहाराजांना विनंती केली की यावर आपण स्पष्टीकरण लिहावे. तेंव्हा श्रीदासराममहाराजांनी डॉ. के. वा. आपटे सरांनी केलेल्या अन्वयार्थावरून नासदीयसूक्ताचा भावार्थ लिहिला. भावार्थ लिहिण्याचे काम इ. स. १९६८ मध्येच पूर्ण झाले. परंतु काही कारणाने ते त्याचवेळी प्रकाशित होऊ शकले नाही. पुढे २७ फेब्रुवारी १९८८ रोजी प. पू. श्रीमामामहाराज केळकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने श्रीदासराममहाराजांचे निष्ठावान शिष्य श्री. पां. सी. गोखले यांनी ते प्रकाशित केले.

नादसीयसूक्ताचा श्री. के. वा. आपटे सरांनी केलेला अन्वयार्थ व श्रीदासराममहाराजांनी केलेला भावार्थ आमच्या वाचनात आला. अन्वयार्थ व भावार्थ दोन्हीही अत्यंत अप्रतिम झालेले आहे. परंतू भावार्थ प. पू. श्रीदासराममहाराजांसारख्या सिध्दपुरुषाने लिहिला असल्यामुळे, तो

अत्यंत उच्च पातळीवरून लिहिला गेला आहे. तेंव्हा त्याचे अधिक स्पष्टिकरण, अधिक सहजसोप्या भाषेत केल्यास सर्वसामान्य वाचक, साधकांना कळण्यास अत्यंत उपयोगी ठरेल अशा विचारातून 'नासदीयसूक्त विवरण' या ग्रंथाच्या लेखनास प्रेरणा मिळाली. श्री.नारायणराव देशपांडे यांच्यावर असलेली प.पू.श्रीदासराम महाराजांची कृपा व प. पू. ती. आण्णांचे आशीर्वाद व निरतिशय प्रेम यामुळे अखंड अभ्यास, चिंतन, मननातून हा ग्रंथ साकार झाला आहे.

या ग्रंथाची विभागणी चार विभागात करण्यात आली आहे. पहिल्या विभागात १९८८ साली प्रसिध्द झालेला ग्रंथ जसाच्या तसा श्रीदासराममहाराजांच्या भूमिकेसह घेतला आहे. त्यामुळे तो पुढील तीन विभाग वाचताना संदर्भ म्हणून उपयोगी पडणार आहे. दुसऱ्या विभागात डॉ. के. वा. आपटे सरांनी केलेल्या अन्वयार्थावर श्री. नारायणराव देशपांडे यांनी विवरण केले आहे. ते करताना श्री. नारायणराव देशपांडे यांनी लोकमान्य टिळक, अहिताग्नि राजवाडे यांनी केलेल्या नासदीयसूक्तावरील भाष्याचा आधार घेतलेला आहे. तिसऱ्या विभागात प. पू. श्रीदासराममहाराजांनी केलेल्या भावार्थाचा सारांश घेऊन त्यावर श्री. नारायणरावांनी विवरण केले आहे. चौथ्या विभागात प. पू. श्रीदासराममहाराजांनी आपल्या चिमड संप्रदायाच्या साधनाच्या दृष्टिकोनातून मांडलेल्या भावार्थाचे विस्तृत व सुंदर वर्णन श्री. नारायणराव यांनी केले आहे.

श्री नासदीयसूक्तात सृष्टिनिर्मितीपूर्व मूळ स्थितीपासून मानवी स्थितीपर्यंतचे वर्णन आलेले आहे. मानवाने पुन्हा आपल्या मूळस्थितीपर्यंत जाणे हे अध्यात्माचे ध्येय आहे. भगवान सद्‌गुरु निंबरगीकरमहाराज यांच्यापासून आलेल्या चिमड संप्रदायामध्ये स्थूलदेहातील मानवाने पुन्हा मूळ स्थितीपर्यंत, ब्रह्मस्थितीपर्यंत जाण्यासाठी लागणारे साधन सांगितले आहे. या परतीच्या प्रवासाची रूपरेषा चिमडसंप्रदायातील साधनेच्या सहाय्याने या ग्रंथामध्ये अत्यंत सुंदर व सहजरित्या मांडलेली आहे. त्यामुळे आपला चिमड संप्रदाय वेदप्रणित कसा आहे हे स्पष्ट झाल्याने आणि आपल्या संप्रदायातील साधनाची स्पष्टता साधकांना अधिक चांगल्या रितीने होऊन साधकांची साधनावरील निष्ठा अधिक दृढ होईल असा आम्हाला मनोमन विश्वास वाटतो.

या ग्रंथाच्या प्रकाशनाची आम्हाला संधी देऊन ती. प. पू. दासराममहाराजांची म्हणजेच चिमड संप्रदायाची अल्पस्वल्प सेवा करण्याची संधी दिली याबद्दल आमचे प. पू. सद्‌गुरु आण्णांचे व श्री. नारायणराव देशपांडे यांचे आम्ही ऋणी आहोत. या ग्रंथाला प. पू. डॉ. के. वा. आपटे सर व आमचे परमस्नेही श्री. अनिलप्रभू केळकर यांचे अभ्यासपूर्ण अभिप्राय व ती. प. पू. आण्णांचे आशीर्वाद लाभल्यामुळे 'आधी सोन्याचे वरी जडावाचे' असे झाले आहे. याबद्दल या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत. या ग्रंथाचे मुद्रण श्री प्रसाद ग्राफिक्सच्या श्री. व सौ.पटवर्धन यांनी अत्यंत सुंदर केले आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे शतशः आभारी आहोत.

अशीच सेवा आमच्या हातून करवून घ्यावी अशी मनोमन प्रार्थना भगवान सद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, भ. स. कोटणीसमहाराज, भ.स. मामामहाराज व भ. स. दासराममहाराज यांच चरणी करून येथेच थांबतो.

॥ राजाधिराज सद्‌गुरुनाथ महाराज की जय॥

**श्री. व सौ. अंजली कुलकर्णी** | **रमेश लाळे**
**श्री. व सौ. जुई मेणे** | **मोहन बर्वे**

# माझ्या मनीचे ...

ऋग्वेदातील अत्यंत छोटेसे, केवळ सात ऋचा असणारे पण अत्यंत महत्वाचे असे, सृष्टिनिर्मितीसंबंधी तात्विक विचार मांडणारे, अर्थात सामान्य माणसाला न उमगणारे असे हे नासदीय सूक्त.

ज्याने ही सृष्टी निर्माण केली अशा परमेश्वराने ऋषी-मुनींना श्रुत केलेली श्रुति म्हणजे हे नासदीय सूक्त आहे. अर्थात सृष्टिनिर्मितीचे खरे रहस्य सांगणारे हे सूक्त आहे. जुन्या संस्कृतमध्ये असणाऱ्या या सूक्ताचे आम्हा प्राकृतांना आकलन होत नाही. म्हणून विश्वकर्त्या श्रीहरींनी - श्रीनारायणानी - भ.स. श्रीनिंबरगीकरमहाराजांनी सिध्दानंदरुपाने गगनी प्रगट होऊन श्रीदासराममहाराजांना 'श्रीगुरुलिंगगीता' श्रुत केली. त्या गुरुलिंगगीतेतील सोळाव्या पदात विश्वउत्पत्तीचा विचार मांडला आहे. त्याचा विस्तार म्हणजे श्रीदासराममहाराजांनी लिहिलेले हे नासदीयसूक्तावरील भावार्थ स्पष्टिकरण आहे. अर्थात ते इतर उपलब्ध स्पष्टीकरणापेक्षा वेगळे आहे.

माझे मित्र, तत्वज्ञानाचे अभ्यासक व श्रीदासराममहाराजांचे कृपांकित श्री. नारायणराव देशपांडे यांनी नासदीयसूक्तावरील प्रसिध्द उपलब्ध भाष्ये व श्रीदासराममहाराजांनी केलेले भाष्य यांचा तौलनिक अभ्यास करून श्रीदासराममहाराजांनी केलेल्या विवरणाचे वेगळेपण दाखवून दिले आहे. नासदीयसूक्ताचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासूकरिता हे 'नासदीयसूक्त विवरण' अत्यंत उपयोगी ठरणारे आहे.

विश्वनिर्मितीचे खरे रहस्य - खरा बोध, साधन केल्याने होणारा आहे. साधनाने, या चराचराचे मूळ काय आहे ? याचा उगम कोठून झाला याचे, तसेच त्या शुध्द निर्मळ स्वरुपाचे ज्ञान होणार आहे. प्रवाहपतीत जीवांना हे ज्ञान होत नाही. याकरिता प्रवाहाचे विरुध्द पोहावे लागते.

श्रीसमर्थ सांगतात,

''येक बळाचे निवडले। ते पोहतची उगमा गेले।
उगमदर्शने पवित्र जाले। तीर्थरूप॥''

''जे या चराचराचे मूळ। शुध्द स्वरुप निर्मळ।
या नाव ज्ञान केवळ। वेदांते यते॥''

याकरिता लागणारे बळ श्रीदासराममहाराजांनी मला व आपणा सर्वांना द्यावे अशी प्रार्थना करून येथेच थांबतो.

**– अनिलप्रभू रामराय केळकर**

## चार शब्द

सत्पात्र आणि सच्चरित्र अशा ऋषीमुनींना वेदग्रंथ हे ऐकू आले, म्हणून त्यांना ऐकू आलेले म्हणजे श्रुत झालेले ग्रंथ म्हणून श्रुति म्हणतात. सध्या तरी चार वेदग्रंथ उपलब्ध आहेत. या सर्वांमध्ये ऋग्वेद हा प्राचीनतम ग्रंथ मानला जातो. तो दहा मंडलात (प्रकरणात) विभागलेला असून प्रत्येक मंडलात सूक्त हा उपविभाग आहे आणि प्रत्येक सूक्तात काही ऋचा (पद्ये) आहेत.

ऋग्वेदात नाना प्रकारचे विषय आलेले आहेत. त्यामध्ये विश्वाची उत्पत्ति इत्यादी विषयांची चर्चा करणारी दहा-बारा तात्त्विक सूक्ते आहेत. त्यांमध्ये 'नासदीयसूक्त' हे एक आहे. या सूक्ताचा प्रारंभ 'नासद्' या शब्दाने होत असल्यामुळे त्याला 'नासदीयसूक्त' असे म्हणतात. या सूक्तात विश्वाच्या उत्पत्तीपूर्वी काय होते आणि उत्पत्ति झाल्यानंतर काय झाले, याविषयी संकीर्ण विचार मांडलेले आहेत.

आपला चिमड संप्रदाय हा वेदानुसारी अद्वैत मानणारा पंथ आहे. त्यात साधुमहाराज, चिमडमहाराज, तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांच्यासारखे आत्मसाक्षात्कारी पुरुष होऊन गेले. कोटणीसमहाराजांचे प्रमुख शिष्य राम गोविंद केळकर उर्फ श्रीदासराममहाराज होते. तेही स्वस्वरुपाचा साक्षात्कार झालेले आत्मानुभवी संत होते, हे सर्वांना ज्ञात आहे. चिमड संप्रदायातील सिद्धसाधनेनुसार झालेल्या आत्मस्वरुपाच्या साक्षात्काराच्या स्वानुभवावर आधारलेले नासदीय सूक्ताचे 'भावार्थ संगती' नाव असणारे त्यांचे विवरण होते.

चिमड संप्रदायाचे दृष्टीने नासदीय सूक्तात नेमके काय सांगितले आहे, याचा मागोवा घेऊन, दासराममहाराजांनी नासदीय सूक्तातील सात ऋचांचे स्पष्टीकरण केले. ते खरे म्हणजे इ.स. १९६८ मध्ये पूर्ण झाले होते. पण ते त्यावेळी प्रकाशित होऊ शकले नाही. इ. स. १९८८ साली या पुस्तकाचे प्रकाशन हे दासराममहाराजांचे एक निष्ठावान शिष्य श्री. पां. सी. गोखले यांनी केले.

इ.स. २०१५ मध्ये श्रीदासराममहाराजांचे वरील विवरण मा.नारायण देशपांडे यांच्या अवलोकनात आले. ते दासराममहाराजांचे निष्ठावंत भक्त आहेत. त्यांना अशी प्रेरणा झाली की, श्रीदासराममहाराजांनी नासदीय सूक्तातील सात ऋचांवर जे लिखाण केले आहे, त्याचे विवरण आपण करावे. त्या प्रेरणेनुसार मा. देशपांडे यांनी श्रीदासराममहाराजांच्या लिखाणाचे विस्तृत विवरण प्रस्तुत ग्रंथात केले आहे. श्रीदासराममहाराजांच्या आत्मानुभवावर आधारलेल्या लेखनाचे अधिक विवरण करण्याचे धाडसाचे काम अनुभव नसणाऱ्या श्री. देशपांडे यांनी केले आहे, याबद्दल वाचक वर्ग त्यांचे कौतुक करील यात शंका नाही.

**– के. वा. आपटे**

# ‘‘अव्वल तो एक कथा !’’

सृष्टी निर्मितीसंबंधी तात्विक विचार मांडणारे ऋग्वेदातील नासदीय सूक्त हे अत्यंत महत्वाचे व प्रसिध्द आहे. सदरचे सूक्त सात ऋचांनी बनलेले आहे. या सूक्ताचा अन्वयार्थ आमचे प्रा. डॉ. के. वा. आपटे तथा ती. केशवकाका यांनी लिहिला असून त्यावर भगवान श्रीसद्‌गुरु माझे पितृदेव श्रीदासराममहाराज केळकर यांनी आपल्या संप्रदायाला धरून भावार्थ लिहिला आहे आणि हा ग्रंथ दिसायला छोटा पण अत्यंत महत्वाचा, श्रीदादांचेच कृपांकित श्री. पां. सी. तथा बाळासाहेब गोरवले यांनी १९८८ मध्ये प्रकाशित केला आहे आणि त्यामुळेच हा सगळा अत्यंत महत्वाचा विषय आमच्यापुढे आला. मुळातच विषय अत्यंत अवघड आणि त्यावर श्रीदादांनी लिहिलेला भावार्थ हा माझ्या सारख्याला लगेच कळण्याजोगा नाही असा अत्यंत अवघड आहे.

यातला विषय सगळ्यांना कळावा या केवळ हेतूने आमचे श्री. नारायणराव देशपांडे यांनी आमच्या श्री दादांच्या कृपेने या अन्वयार्थावरील व भावार्थावरील विवरण शब्दबध्द केले आहे. केवळ श्रीदादांची कृपा हेच याला कारण आहे.

या सृष्टीच्या निर्मितीचा विषय आमच्या ती. प.पू. श्रीदादांच्या नित्याच्या कीर्तनात यावयाचा. या सृष्टीची निर्मिती परमेश्वराच्या एका संकल्पातून ‘एकोहं बहुस्याम्’ झाली आहे. एका स्पंदातून झाली आहे. यावेळी ते उजव्या हाताचा अंगठा व त्याजवळचे पहिले बोट एकमेकावर ठेवून वर खाली करून दाखवायचे आणि त्यापुढे ते सांगायचे, ‘‘स्पंदाशिवाय पदार्थ नाही, श्वसनाशिवाय स्पंद नाही, जीवाशिवाय श्वसन नाही. म्हणजे आहे ते सगळे सजीव आहे, चैतन्यरूप आहे आणि चैतन्य हे वायूरूप आहे आणि त्याला चिद्‌वायू म्हणतात.’’

‘‘वाऱ्याने दुनिया गेली गड्यानो। वाऱ्याने दुनिया गेली।
आत वारा, बाहेर वारा। त्याचा निर्गुणात पसारा।
त्या वाऱ्याचा शोध करा॥’’

यातील वर्म असे आहे, जसं जसं निर्माण होतं तसं तसं ते लय पावते.

या सृष्टीच्या निर्मितीच्या संदर्भात आणखी एक अत्यंत महत्वाचा विषय श्रीदादा कीर्तनात सांगायचे. हे सगळे कशातून निर्माण झाले, या संदर्भात श्रीएकनाथमहाराजांचा एक अभंग आहे. त्यातील आशय माझे पितृदेव ती.प.पू. श्री दादा किर्तनात खालील पध्दतीने सांगत असत-

अव्वल तो एक कथा। उसे नाम तथा।
इस दरमियान पैदा हुआ ॥
एक से दो। दो से तीन। तीन से चार।
चार से पाँच । पाँच से पच्चीस।
पच्चीस से छत्तीस। छत्तीस में एक रहा है।
वह गुरुगारुडी को याद है॥

सुरुवातीला एक कथा म्हणजे वस्तू होती. ती वस्तू म्हणजे नाम आहे. ‘‘गोविंद म्हणे नाम वस्तू। येर सर्वही अव्यस्तु’’ असे माझे ती. प.पू. आजोबा श्रीमामामहाराज केळकर म्हणतात आणि नाम म्हणजे चैतन्य असे जगद्‌गुरु श्रीतुकाराममहाराज म्हणतात, ‘‘तुका म्हणे नाम। चैतन्य निजधाम॥’’

म्हणजे सुरुवातीला चैतन्य होते, त्याला नाव नव्हते.

‘‘देव देव म्हणुनि व्यर्थ का शिणसी।
निजदेव नेणसी मुळी कोण? ॥१॥
देवा नाही रुप देवा नाही नाम। देवा नाही गाव कोठे काही॥२॥
ज्ञानदेव म्हणे भजा आत्मदेवा। अखंडित सेवा करा त्याची॥३॥’’

असे भगवान सद्‌गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

‘इस दरमियाने पैदा हुआ।’ आणि यातून हे सगळे निर्माण झाले.

सगळ्या सृष्टीच्या बुडाशी एक चैतन्य आहे, हाच यातून सारांश निघतो असे मला वाटते.

या नासदीय सूक्ताबाबत काही लिहिण्याला मी अधिकारी नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. पण श्री. नारायणराव देशपांडे यांनी फार आग्रह केला

आणि हा आग्रह तरी का केला तर ती. प. पू. श्रीदादांच्या पोटी माझा जन्म झाला हे एकमेव कारण त्याला आहे. हे चार शब्द श्रीदादांच्या कृपेनेच लिहिले गेले आहेत. शेवटी आमचे ती. प. पू. श्रीदादा म्हणतात तेच योग्य, 'योग्य वाटलं तर घ्या नाहीतर सोडून द्या.'

आम्हाला हा सगळा विषय कळण्यासाठी श्रीनारायणराव देशपांडे यांनी त्याचा अभ्यास केला, कष्ट घेतले त्याचे आकलन आम्हाला झाले तर त्याचे चीज होईल. तसे व्हावे अशी भगवान श्रीसद्‌गुरु श्री दादांचे चरणी प्रार्थना करतो.

अधिकार नसतानाही माझेकडून हे लिहिले गेले आहे याबद्दल क्षमा मागतो.

शेवटी भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेब महाराज कोटणीस, माझे आजोबा ती. प.पू. श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती. प.पू. श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी शतशः वंदन करून येथेच थांबतो.

' वारा माझा मी वाऱ्याचा। तोचि देव या देवांचा।'

- श्रीदासराममहाराज

शेष श्रीराम स्मरण।

सांगली
दिनांक : २८/१२/२०१५

श्रीदादांचा कृपाभिलाषी
**चंद्रशेखर रामराय केळकर**

## श्रीदासराममहाराजांची भूमिका ....

श्रीनासदीयसूक्त हा सर्व वेदांचा गाभा आहे, हे तरी निःसंदिग्धपणे सूर्यप्रकाशाइतके सर्वमान्य आहे. या विश्वाचा मागे काही अतिंद्रिय स्वरुपाची अंतःप्रेरणा आहे आणि ती सतत मिळत राहिली आहे. अर्थात या प्रेरणेमागे काही प्रेरकशक्ती आहे. तिला प्रेरणाशक्ती असे नामाभिधान करणेचे उचित होईल. हे सारे काही अनादिसिध्द आहे. म्हणून तर 'हे अनादि सिध्द आघवे। होत जात स्वभावे। म्हणोनि तुवा न शोचावे। पंडुकुमरा॥'' असे श्रीज्ञानेश्वरमाऊलींनी प्रतिपादन केले आहे. 'होणार ते होयेना का। जाणार ते जायेना का। येथे फिटती आशंका॥ श्रोत्रयाची॥' समुद्रात हौदभर पाणी ओतले काय आणि त्यातले काही काढून घेतले काय, त्यात काय कमी जास्त व्हावयाचे आहे, असा प्रश्न आहे. ''आहे ते सांडी नाही ते सांडी। शेरवी जे उरेले तेचि तू मांडी॥'' हा श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अभंगचरण म्हणजे तो एक अभंग सिध्दांत आहे, असे म्हणावे लागेल. आहे म्हणून नाही व नाही म्हणून आहे असे जे काहीतरी आहे ते काही नाही म्हणणे हे काहीतरी होईल यात संदेह आहे काय ? ज्यामुळे हे सारे आहे व ज्यामुळे हे सारे नाही असे जे एक तत्व आहे, तेच खरे महत्वाचे आहे. बाकी दृश्य हे सारे सापेक्ष आहे, द्वंद्वात्मक आहे. म्हणून त्यात संघर्ष आहे, कष्ट आहे. या दृष्टीने जीवनाची व्याप्ति 'कलह' या तीन अक्षरांतच आहे. या अनेक दृश्यांत एक आत्मतत्व ज्यांनी पाहिले ते या द्वंत्वातून सुटले, हे तर अगदी उघडपणे उघड आहे. याठिकाणी दृश्य आणि त्यातील दृश्य असणारी इंद्रिये ही उघडीच पडतात म्हणून तर श्रीमंत ज्ञानोबाराय म्हणतात, ''आत्मसुखाचिया गोडीया। विटे जो का सकळ विषया। जयाचिया ठायी इंद्रिया। मानू नाही॥'' जो आत्मलाभासारिखे। गोमटे काहीच न देखे। म्हणौनि भोग विशेखे। हरिखेजेना॥'' हे ज्ञानेश्वरीत आलेले सिध्दांत सूत्रमय असून चिंतनीय आहेत.

आत्मा हा घोररूपाने प्रकट झाला की जीवमात्र प्राणी हा बिनघोर होतो व तो आत सुप्त अवस्थेत राहिला की तेथे जीवास दृश्याचे भान होते. म्हणून हे सारा जग शेवटी अवस्थात्मक आहे. एक माणूस जागा आहे, एक बेशुध्द आहे, एक झोपेत आहे व एक मेला आहे. येथे प्रत्येकाचे जग, त्यातील व्यवहार, त्यातील भान व ज्ञान आणि अनुभव, हे भिन्न आहेत की नाहीत ? असा प्रश्न आहे. पण या सर्वांत जो अनुभवी आहे, ज्याने विश्वाचा प्रयोग केला आहे, म्हणून जो प्रयोगाने सिध्द होत नाही, असा जो आत्मा, तो सर्व विश्वापेक्षा, देहापेक्षा, दृश्यापेक्षा, इंद्रियापेक्षा वेगळा आहे की नाही, हे विचारात घेतले की मौज वाटते. मग त्यात पृथक असणाऱ्या आत्म्याचा काही पत्ता तरी आहे का ? असा प्रश्न साहजिकच येतो. लक्ष्यात अलक्ष की अलक्ष्यात लक्ष, लक्ष्यात लक्ष की अलक्ष्यात अलक्ष, असेच ते एक समीकरण आहे. 'आत्मा पूर्णपणी लक्ष सोहंस्मरणी। लक्षासी उन्मनी आणा कारे॥' पूर्ण आत्मा हा सोहंस्मरणात लक्ष्य होतो. पण ही साधना ज्याने आत्मानुभव घेतला आहे, त्याचे केवळ कृपेनेच साधता येते. 'चौदेहाचे माथा ठेवोनिया हात। उन्मनी साक्षात् दाखविली॥'' उन्मनी अवस्थेत शब्दाचा म्हणजे आकाशाचा अर्थात् अज्ञानाचा निरास होतो. ज्याने चार देहांचा ग्रास केला आहे असाच गोसावी भेटला पाहिजे. 'उन्मनीसंयोगे गोसावी विराजे। चौदेहाचे ओझे निवारोनी॥'' हा श्री ज्ञानेश्वर-सिध्दांतच खरा आहे. याने डोळ्याला डोळा दिला नाही तोच तो खेचून घेतो, जीवाचे आकर्षण करून त्याला आपल्यासारखे करतो. म्हणून 'जव जव डोळा लावितो गोसावी। अधिकची गोवी आपणामाजी॥'' असे श्रीमंत तुकोबाराय म्हणतात.

'यो बुध्देः परतस्तु सः।' असा बुध्दीपलीकडील, तर्कापलीकडचा आत्मानुभव हा विषय असल्याने, देहातीत होण्याची नितांत गरज आहे. 'शुध्द करा मन व्हारे देहातीत' हे श्रीतुकोपनिषद् देहातीत कसे व्हावे हेच तत्व सांगत आहे. ''जव जव देह हे असेल। तव वोळगी ऐसी कीजेल। मग देहांती नवल। बुध्दि आहे॥'' हा देह आहे म्हणजे देहभावाने देहाचे भान आहे. तवर हे द्वंद्व राहणारच आहे. देवाला पाहिले की देहभाव नाहीसा होतो. 'देहभाव हरपला। तुज पाहता विठ्ठला॥' या तुकोक्तीप्रमाणे देहभाव गेल्याने, 'कळो नये सुखदुःख आणि तहान हरपली भूक।' असे झाले आहे. येथे सुखदुःख होत नाही असे नाही; त्याची जाणीव होत नाही, इतकाच त्यात भावार्थ आहे. 'भुकेलिया भूकची खावी। तहानलिया तहानची प्यावी।' या ज्ञानेशोक्तीप्रमाणे त्या जीवाची गत होते. जीव मात्र हा केवळ देहाने बध्द असल्याने, तो चैतन्याचे नादानुसंधानात आला तर सुटला, हे एक रहस्य आहे. नादानेच आत्मानुभव येतो. ''जीवू देहे बांधिला। तव

तो एके बोलेचि सुटला। आत्मा बोले भेटला। आपण या॥'' हा अमृतानुभवातील ज्ञानराजमाऊलींचा सिध्दांत विचारात घ्यावा असा आहे. कोळी आपल्या अंगापासून जाळे विणतो व तोच जाळ्यात सापडतो, असा कांहीसा प्रकार जीवाचे बाबतीत दिसून येतो. येथे जीवाने देहाची बांधणी केली की देहाने जीव बांधला, असा प्रश्न आहे. माणूस घर बांधतो, का घर माणसाला तयार करते, असा प्रश्न आहे. या दृष्टीने नादानुसंधानाचे महत्व आहे. या साधनेने जीव हा आत्मरूपच होतो. 'ज्याचे नाव घेसी तोचि तू आहेसी' या श्रीतुकोबांच्या वचनाप्रमाणे जीवाला आत्मप्रत्यय येतो. 'देव देऊळ परिवारु। की जे कोरोनी डोंगरू। तैसा भक्तीचा व्यवहारू। का न व्हावा॥'' असे श्री ज्ञानोबांनी या दृष्टीनेच अमृतानुभवात आपले अमृतवचन उधृत केले आहे. हे सारे जग जन्माला येणे आणि गमनागमन करणे, या स्वरुपाचे केवळ गतीमान आहे. म्हणून अलातचक्रवत् प्रतीत होत आहे हे ज्याने प्रतीत होते तो प्रतीत होणे, हीच खरी प्रतीत आहे. चैतन्याचा विलास म्हणजे जग आहे. ''कल्लोळ कंचुक। न फेडिता उघडे उदक। तेवी जगेसी सम्यक। आपणचि जो॥ परमाणूंचिया मांदिया। पृथ्वीपणे न वजेचि वाया। तेवी विश्वस्फूर्ती ह्या। झकवेना जो॥'' असे हे चैतन्यमय दृश्य व दृश्यमय चैतन्य आहे. दृष्टीचा देखणा असेल तो याचे अलोकन करू शकतो. हे आत्मतत्व जाणू शकतो. हे सारे सोहं विश्व आहे. यात आत्मा आहे तो सोहमात्मा आहे. ''सोहं आत्मा स्वानंदघन। अजन्मा तो तू चि जाण। ऐसे हे साधुचे वचन। सुदृढ धरावे॥'' असे समर्थ ठणकावून सांगत आहेत. 'सोहं ब्रह्म विटेवरी' या तुकोक्तीप्रमाणे सोहं हेच ब्रह्म आहे. सोहं समाधि आहे. ''चार सहा करती ध्यान। सोहम् समाधी लागून'' हे तुकोपनिषद् हेच दर्शविते. तर ''चारी वाचा कुंठित झाली। सोहं ज्योति प्रकाशली'' असा निर्वाळा जनाबाई देतात आणि यातील इंगित ''गोविंद म्हणे सोहं हंस। तेथे जडवी मानस॥'' या शब्दात माझे प. पू. पितृदेव श्रीमामामहाराज केळकर हे आपले अमृतवाणीत प्रगट करतात.

या सर्व अमृत विचारांचा मागोवा घेऊन, चिमडसंप्रदायाचे दृष्टीने नासदीयसूक्तात नेमके काय सांगितले आहे, ज्या ऋषीमुनींनी हे अतींद्रिय ज्ञान शब्दांकित केले त्याचा मागोवा घेऊन, चि. केशव वामन आपटे यांनी या सूक्ताचा दिलेले अन्वयार्थ पाहिल्यानंतर, मला जे कांही आत वाटले, ते यशामति यथावकाश थोडक्यात येथे दिले आहे. या योगे ऋषी-मुनींनी ही सेवा गोड करून घेऊन या अर्भकाला आशीर्वाद द्यावा. लोकमान्य टिळक, अहिताग्नि राजवाडे वगैरे महात्म्यांनी यावर जे कांही भाष्य केले आहे त्यांनी कांहीसे कवतुकाने या विषयाकडे पाहून मला प्रोत्साहन देऊन उत्तेजित करावे व भगवान श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, श्रीलक्ष्मीबाई आक्का, साधुमहाराज, चिमडमहाराज, श्रीतात्यासाहेब महाराज व श्रीमामामहाराज केळकर यांनी मला मस्तकी हस्त ठेवून आपल्या चरणी अक्षय जागा द्यावी, अशी सहस्त्रशः अनेक अनेक लोटांगणे घालून माझी कळवळ्याची प्रार्थना आहे. त्यांचे कृपेनेच हा विषय मला लेखनबध्द करता आला, हे उघड आहे. परमप्रिय प्रा. ना. बा. पाटणकर यांनी सुचविल्याप्रमाणे ही अंतःस्फूर्त सेवा घडल्याने, त्यांना व संत सज्जन साधकांना या छोट्या लेखनाबद्दल आत्मीयता निर्माण होऊन, हे सारे आत्मप्रवण लेखनास आत्मीयतेने पाहून, त्याद्वारे आत्मोन्नति आणि विश्वोन्नति साधतील असा विश्वास बाळगून, हे माझे मनोगत किंवा ही नासदीयसूक्तावरील कांही विचारांची येथे मांडलेली भूमिका श्रीमामांचे जन्मशताब्दि समारंभपर्वणीत भगवान् श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकर महाराज यांचे पावन पदकमली भक्तिभावे अनन्य होऊन समर्पण करीत आहे. त्यांचे ऋणात अखंड राहणे, हीच माझी ठाम भूमिका आहे.

सांगली **दासराम**
श्रीगणेशजयंती, शके १९०९
दिनांक : २२/१/१९८८

# नासदीय सूक्त - विवरण

(श्रीदासराममहाराजकृत भावार्थावरील विवरण)

## प्रकरणे

१) नासदीय सूक्त : अन्वयार्थ व भावार्थ

२) नासदीय सूक्त : विवरण

३) नासदीय सूक्त :
भावार्थावरील विवरण (भाग १)

४) नासदीय सूक्त :
भावार्थावरील विवरण (भाग २)



# नासदीय सूक्त - विवरण

(श्रीदासराममहाराजकृत भावार्थावरील विवरण)

## प्रकरण क्र. १

## नासदीय सूक्त : अन्वयार्थ व भावार्थ

अन्वयार्थ : डॉ. के. वा. आपटे
भावार्थ : श्रीदासराममहाराज

# ॐ
# नासदीय सूक्त

(ऋग्वेद, मंडल १०, सूक्त १२९, ऋचा ७)

**श्रीदासराममहाराजकृत भावार्थ स्पष्टीकरणासह**

## ऋचा १ ली

**नासदासीन्नो सदासीत्तदानीं**
**नासीद्रजो नो व्योमा परोयत् ।**
**किमावरीवः कुह कस्य शर्मन्**
**अम्भः किमासीद् गहनं गभीरम् ।।१ ।।**

**अर्थ :**

तेंव्हा म्हणजे अगदी आरंभी असत् नव्हते आणि सत् ही नव्हते, अंतरिक्ष नव्हते आणि त्यापलिकडील जे आकाश तेही नव्हते. (अशा परिस्थितीत) कोणी कोणाला आवरण घातले ? कोणाच्या सुखासाठी (तेथे) अगाध, गूढ असे पाणी तरी होते काय ?

**भावार्थ स्पष्टीकरण :**

तेंव्हा सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी सत् नव्हत, असत् नव्हते. सृज् म्हणजे निर्माण करणे, यापासून सृष्टि हा शब्द बनला आहे. सृष्टीची उत्पत्ति म्हणजे तो एक वायुलहरींचा आकार आहे. निराकार हे जेंव्हा साकार झाले, त्यासच सृष्टि हे नामाभिधान प्राप्त झाले. साकाराचा आकार म्हणजेच साकार होय. हा एक वायुलहरींचा परिणाम आहे. वायुलहरी अतिसूक्ष्म आहेत. विटांवर वीट ठेवून





भिंत व्हावी किंवा नाण्यावर नाणी ठेवून चवड व्हावी, तद्वत्च हा आकार, लहरीलहरींनी बनला आहे. ही सृष्टि जी निर्माण झाली, त्यापूर्वी सत्ही नव्हते आणि असत् ही नव्हते. आपण जरा जरी विचार केला तर असे दिसून येईल की या वायूमुळेच अवस्था निर्माण होते. जागृती, स्वप्न, सुषुप्ति आदिकरून ज्या अवस्था आपण भोगतो, त्या वायूच्या अभावी आपणास संपादन करता येणार नाहीत. प्रत्येक पदार्थाला अगर जीवमात्राला जी जी अवस्था प्राप्त होते अगर तीत रुपांतर, स्थित्यंतर आणि अवस्थांतर घडलेले आपणास दिसून येते, त्याला कारण वायूच आहे. आपले शरीरातील श्वासोच्छ्वासच जर संपले, तर आपणांस या अवस्था येतील, हे स्वप्नात तरी संभवते काय ? असा प्रश्न आहे. वायुमुळे अवस्था आहे, असे म्हटल्यानंतर जशी अवस्था तसे भान निर्माण होते. जागृति असेल तर दृश्य वस्तूंचे भान, स्वप्न असेल तर अदृश्य पदार्थाचे भान व सुषुप्ति असेल तर आपणच बेपत्ता झाल्याने त्या अवस्थेने आपण बेभान होतो, म्हणजे आपणास कशाचेच भान असत नाही. म्हणजे अवस्थेप्रमाणे भान व वायुमुळे अवस्था हे स्पष्ट झाले. ज्याप्रकारे जीवमात्राला भान झाले, तसे तसे त्या प्रकारचे ज्ञान त्याला होत असते व ज्या प्रकारचे त्याला ज्ञान होते, त्या ज्ञानाप्रमाणे त्याला जाणीव होते. ही जाणीव आपणास जसे आपले अस्तित्व असेल तशी होते. याचे बुडाशी चेतना देणारे चैतन्य आहे. ते जसे कमीजास्त होते, तशी जाणीवही कमी जास्त होत असते. याठिकाणी चैतन्य हे स्फुरद्रूप असते. या स्फुरणानेच जे कार्य आपणास प्रतीत होते, त्याला सत् असे म्हणतात. ही जाणीव ज्याने नाहीशी होते अशी वायुलहरींची आलटापालट यास असत् असे म्हणतात. हे सत् आणि असत् आपल्या श्वसनक्रियेशी अगदी निगडीत आहे. यालाच चैतन्य आणि जड असे म्हणतात. श्वास + उच्छ्वास म्हणजे श्वासोच्छ्वास हेच चैतन्य आणि जड किंवा सत् आणि असत् याचे

प्रतीक आहे. श्वासात हलकेपणा व शुध्दत्व असते, तोच धर्म आपणास उच्छ्वासात आढळणार नाही. चैतन्य सुप्त झाले की त्यास जडत्व येते व तेच जागृत झाले की त्यास हलकेपणा येऊन, त्यास शुध्दता प्राप्त होते. चैतन्य हे ऊर्ध्वगामी असते तर जड हे अधोगामी असते. जडाने दृश्यत्व आणि मिथ्यत्व निर्माण होते. तर चैतन्याने त्याच्या खऱ्या वास्तवरुपाची प्रचीती येते. एकाने दृश्याची लाट पसरते तर दुसऱ्याने द्रष्ट्याची ओळख होते. हे दोन्ही जेथे नाहीत, तेथे निर्वात लहरी म्हणजे वायूच्या सूक्ष्मतम लहरी पसरलेल्या असतात. त्यामुळे दिक्, काल आणि आकाश यांचे पलिकडे असलेल्या कुंभक काळातील आत्मतत्वाची ओळख येथे होते. अर्थात् तेथे रजही नाही. जो सूक्ष्म वायू प्रवाही झाला, त्या वायूचे चांचल्याने अनेक रज:कण एकमेकाला धक्का देऊ लागले व त्या गतीने ते प्रवाही झाले. त्याचे संकोचनानेच ते स्थिर होतात. वायूचे प्रवाहीपणामुळे पोकळ भाग निर्माण होतो. त्याने स्वरातील गमन, लय, ठाय यांचे ज्ञान होते. जड वायू भूताकाशात तेज, वायू, भूमि, पाणी व त्याचे पलीकडील द्युलोक प्रतीत होतात. पण जेथे हे रज नाहीत, तेथे या गोष्टी प्रतीत होणार कोठून ? आवरणच नाही तर अनावरण कोठचे ? वातावरण कोठले ? याचे अधिष्ठान तरी कोण ? तो कुठे आहे ? व हा सर्व झालेला दृश्याचा खेळ तरी कोणासाठी ? विचार केला तर ते जे मूळचे जीवन आहे, ते अकुंठगति आहे. जेथे आपल्या जीवनाची गति कुंठित होते. यामुळे दृश्यादृश्यातीत असे काही स्वरूप प्रतीत होते, तेच ते आपले अगाध असे निर्लहर वायुरूप जीवन होते काय ? जीवसृष्टि ही सापेक्ष आहे. म्हणूनच निसर्गात देवाण-घेवाण सुरु आहे. ही सापेक्षता जेथे नाही, तेथे आपले जीवन निरपेक्षच असणार हे उघड आहे. वायूची सहजता तेथे आहे असे, सर्वांच्या आरपार गेलेले व सर्वांपलीकडे असलेले, जे सर्वात असून कशात नसलेले,





आपले स्वयंसिध्द जीवन ते स्वयंपूर्ण आहे. ज्या वायूवर काळाचे गणन, आकाश, दिशा व दृश्य हे अवलंबून आहेत, त्यापलीकडील स्थिती हीच आत्मस्थिती आहे. म्हणून ती अकुंठगति आहे. श्वास आणि उच्छ्वास यांचे दरम्यानचे जे जीवन आहे तेच ते जीवन आहे काय ? हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. तोच यथायोग्य आहे. असेच ते आपले विशुध्द जीवन आहे.

### ऋचा २ री

**न मृत्युरासीदमृतं न तर्हि**
**न रात्र्या अह्‌ न आसीत् प्रकेत:**
**आनीदवातं स्वधया तदेकं**
**तस्माद्धान्यन्न पर: किंचनास ।।२ ।।**

**अर्थ :**

तेंव्हा (तर्हि) मृत्यू नव्हता, अमृत नव्हते, रात्र आणि दिवस यांचा भेद करण्याचे साधन वा चिन्ह (प्रकेत) नव्हते. ते एक आपल्या सामर्थ्याने (स्वधया) वा स्वेच्छेने वायुशिवाय (अवातं) श्वासोच्छ्वास करीत होते. (आनीत्) स्फुरत होते. त्याखेरीज किंवा त्या पलिकडे दुसरे असे कांहीच नव्हते.

**भावार्थ स्पष्टीकरण :**

तेंव्हा (तर्हि) मृत्यू नव्हता, अमृत (अमरत्व) नव्हते. 'मरणं प्रकृतिः विकृतिर्जीवितमुच्यते।' ज्यात कांही बदल होत नाहीत त्याला प्रकृति म्हणतात. जेथे अगदी सामसूम आहे, अशी जी शून्यभूत जीवनाची गाढ अवस्था की जेथे आपण कोण आहोत, काय आहोत, कसे आहोत व कुठे आहोत याचा पत्ता आपल्यालाच लागत नाही, असा जो मृत्यू तो जेथे नव्हता अर्थात् त्या जीवनात होणारी विकृति जे आपले जीवित्व त्याचाही तेथे प्रश्नच उरला नाही. 'तुझिया वियोगे जीवित्व आले' असे श्रीसमर्थ म्हणतात. हे जे आत्मवियोगी विकृत जीवन, जेथे व्यष्टिभाव असल्याने सापेक्ष व्यवहार किंचित्काळ बुडबुड्याप्रमाणे चालतात, वायुरूप बहिर्मुख जीवनाचा जेथे उद्रेक असतो, ज्यातील उच्छ्वासाने जीवनाचे आकर्षण देह व दृश्य यांच्याशी निगडीत असते, जेथे जीवनाचे उदयास्त झपाझप चालू असतात, पण जीवनाची खेच या बुडबुड्यात असल्याने, दृश्य व्यवहार आकाशातील पोकळ दृश्यात त्या पोकळीनेच पोकळ घडतात. त्यामुळे तेथे आत्मसुखातही पोकळी निर्माण होते व जीव आत्मसुखाला आंचवतो, ही अवस्थाही रहात नाही. प्राणापानाचे निरोधाने इडा पिंगला या सुषुम्नाकार झाल्यावर ललाटोर्ध्व भागात जो अमृतस्राव म्हणजे अमरत्वही जेथे नाही, रात्र व दिवस वाचक इडा पिंगला नाड्या ज्या आत्मतत्वात लय पावल्या, तेथे आयुष्याची गणना होणे कठीण. दिक्, काल आणि आकाश यांचे अतीत आत्मावस्थाच आहे. तेथे रात्र व दिवस ज्या देहधारणाने जाणीवेत येणारच मग आपल्याला त्याचे ज्ञान होणार, ते चिन्ह वा त्याचे साधन जी देहावस्था ही तेथे नाही. जे एकच आत्मतत्व अनेक झाले आहे, ते आपल्या सामर्थ्याने (स्वधया) वा स्वेच्छेने वायुशिवाय (अवातं) श्वासोच्छ्वास करीत होते, स्फुरत होते. वायूचा ग्रास जेथे होतो तेथे





उठणाऱ्या आत्मलहरींचे अतिसूक्ष्म असे स्पंदन निरतिशय, निरामय, निरवकाश स्थितीत होते. तेथे वाऱ्याने वाऱ्याचा निरास झाल्यामुळे ते सूक्ष्म वायूस्पंदन तेवढेच राहिले. त्या व्यतिरिक्त निराळे दुसरे व त्या पलीकडे आणखी कांही श्रेष्ठ असे कांहीही नव्हते.

❖

**ऋचा ३ री**

**तम आसीत् तमसा गूळ्हमग्रे**
**ऽप्रकेतं सलिलं सर्व मा इदम्।**
**तुच्छेनाभ्वपिहितं मदासीत्**
**तपसस्तन्महिमा जायतैकम्।।३।।**

**अर्थ :**

अंधःकार होता. आरंभी अंधःकाराने झाकलेले पाणी होते किंवा आरंभी अंधःकाराने अंधःकार झालेला होता. हे सर्व (इदं सर्वम्) चिन्ह विरहित (अप्रकेत) सलिल (पाणी) होते. जे आभु (सर्व व्यापी, प्रादुर्भूत होणारे), तुच्छाने म्हणजे फोल आकाशाने आच्छादिलेले होते. (अपिहि), ते एक तपाच्या महिम्यामुळे (महिमा) प्रादुर्भूत किंवा निर्माण झाले, प्रगट झाले (अजायत).

**भावार्थ स्पष्टीकरण :**

प्रथमतः जाणीव-नेणीव-रहित वायुतत्व होते. प्रकाश नव्हता.

प्रकाश पसरलेला नव्हता, तो अंतर्भूत होता. काळोख होता. हा जो काळा रंग यातूनच सर्व रंग निर्माण झाले. पण प्रथम जेंव्हा वायू होता आणि त्यात प्रकाश नव्हता, तेंव्हा तो जाणीव नेणीवेचे अतीत असल्याने अंध:काराने अंध:कार झाकला होता. तेथे दृष्टीचे कांही कामच नव्हते म्हणून तो अंध:कार होता किंवा तेथे कांही दृश्य नव्हते म्हणून अंध:कार होता. मग तेथे द्रष्टा या भूमिकेचे तरी काय काम ? म्हणून अंधार होता. हे सर्व चिन्ह विरहित जीवन होते. ते वायुरूप जीवन सर्वव्यापी प्रकर्षाला येणारे, पण जाणीव, नेणीवेच्या अभावी शून्यांत झाकलेले, शून्यापेक्षाही सूक्ष्मतर, सूक्ष्मतम असे होते. म्हणजे त्याला एक आकाशाचे आवरण होते आणि त्यात प्राण खेळत होता. आकाश व प्राण यांच्या संघर्षाने जो एक प्रकाश निर्माण झाला त्यामुळे हे गुह्य असे आत्मतत्व प्रगट झाले, सुप्त होते ते जागृत झाले.

ऋचा ४ थी

**कामस्तदग्रे समवर्तताधि**
**मनसो रेत: प्रथमं यदासित् ।**
**सतो बन्धुमसति निरविन्दन्**
**हृदि प्रतीष्या कवयो मनीषा ।।४।।**

**अर्थ :**

मनाचे जे रेत म्हणजे बीज आरंभी (अग्रे) निघाले तोच काम (म्हणजे सृष्टि निर्माण करण्याची प्रवृत्ती किंवा शक्ती) झाला आणि (हा काम म्हणजे)





असत् मध्ये (असति) सत्चा संबंध (बंधू) होय असे (आत्म–)ज्ञानी पुरुषांनी (कवय:) अंत:करणात (हृदि) विचार करून (प्रतीष्या) बुध्दीने (मनीषा) निश्चित केले (निरविन्दन).

**भावार्थ स्पष्टीकरण :**

वायूचा आणि मनाचा निकटचा संबंध आहे. वायुमुळेच उपाधि आणि जाणीव निर्माण होते. शरीरातील जर एखादे अंगातील वारे गेले, तर तेथे ते अंग लटके पडल्याने जाणीवच होत नाही. तेच जर वायू व्यवस्थित खेळत असेल, तर जाणीवेचे म्हणजे मनाचे कार्य दिसून येते. प्रत्येक पदार्थाचा व प्राण्याचा जन्म व त्याचे अस्तित्व, वाढ, त्याचा घडणारा व्यवहार व शेवटही वायूमुळेच होतो. प्रत्येक अणुपरमाणूतून घडणारी हालचाल वायूमुळेच आहे. ही वायूशक्ती जेथे शून्यभूत होते, तेथेच जडत्व येते व ती प्रादुर्भूत झाली की जडाची जाणीव राहात नाही व ती प्रकर्षाला गेली की आत्मतत्वाची जाणीव होते. त्याचा साक्षात्कार होतो. संकल्प हेच मनाचे रेत (बीज) असून, त्यामुळेच या वायूरूपात इच्छा निर्माण झाली. हे अखिल विश्व म्हणजे या वाऱ्याचा एक सहज संकल्प आहे. अर्थात् हा वायू बाहेरच्या वाऱ्यासारखा नसून तो आकाशापेक्षाही सूक्ष्म आहे. याठिकाणी जी केवळ दृष्टि एका बिंदूवर निर्हेतूकपणे गेली तेथून लहरी निर्माण होऊन शून्य, प्रस्फुट, गगन, आकाश यांची निर्मिती होऊन, पुढे भूतसृष्टि झाली. चैतन्य हे या रुपाने प्रकाशमान झाले व ज्याला हे समजून आले, त्याला हा वायू प्रकाशमान झाला, त्यालाच साक्षात्कार झाला असे म्हणतात. मनाचे जसे स्वप्न निर्माण व्हावे तसा हा खेळ आहे. झोपेत वायू वहात असतो तेथेच मनाचा खेळ घडत असतो. झोपी गेलेला तो झोपीच गेलेला असतो. पण वायूवर ज्या मनाची धारणा त्यायोगे स्वप्नसृष्टि निर्माण होते, प्रकाशमान होते, प्रत्यक्षात मात्र तेथे काहीच नसते.

म्हणून 'प्राण एव आत्मा' असे श्रुतिवचन आहे. हे जे आत्मतत्व, तेथेच 'एकोऽहं बहुस्याम्' ही जी स्फूर्ति झाली तेथेच हे विश्व साकार झाले आणि हा काम असत्मध्ये (असति) सत्चा संबंध (बंधू) होय, असे झाले. कारण यामुळेच हे विश्व साकार झाले, प्रतीत झाले असे आत्मज्ञानी पुरुषांनी (कवय:) अंत:करणात (हृदि) विचार करून (प्रतीष्या) बुध्दीने (मनीषा) निश्चित केले. वायूचे ठिकाणी मनाचा व मनाचे ठिकाणी मन:स्वप्न साकार करण्याचा सहजधर्म आहे. म्हणूनच हे दृश्य शेवटी टिकू शकत नाही आणि जरी टिकले तरी ते त्याच्या सहज धर्मानेच हे जाणून घेण्यासारखे आहे.

### ऋचा ५ वी

**तिरश्चीनो विततो रश्मिरेषां**
**अध: स्विदासीदुपरि स्विदासीन् ।**
**रेतोधा आसन् महिमा आसन्**
**स्वधा अवस्तात् प्रयति: परस्तात् ।।५ ।।**

**अर्थ :**

यांचा किरण किंवा सूत्र (दोर) (एषांरश्मि:) तिरका/आडवा (तिरश्चीत) पसरला (वितत:) आणि खाली होता म्हटले तर वरही होता. (अध: उपरि) त्याच्यातील काही बीजप्रद (रेतोधा:) झाले व वाढून मोठेही झाले. त्याचीच स्वशक्ति (स्वधा) अलिकडे व पलीकडे व्यापून राहिली.





**भावार्थ स्पष्टिकरण :**

हे जे आत्मतत्व आहे, ते सूत्ररूप असल्याने 'सूत्रे मणिगणा इव' या न्यायाने हा वायूप्रकाशरूप जीवनाचा ओघ दृश्याचे आड आडवा असा पसरलेला आहे. या योगे 'अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा:' या उक्तीप्रमाणे अधोर्ध्वदृश्यरुपाने हा वायूप्रकाशजीवनाचा ओघच प्रतीत होत आहे. मग तोच अधोर्ध्व नाही असे कसे म्हणावे ? संकल्प धारण करणे अगर संकल्पातीत होऊन, या दृश्याचा निरास करणे हे सामर्थ्य या आत्मतत्वातच आहे. अर्थात् असे ते महान आत्मतत्व या सृष्टीपूर्वी होते. अर्थात ती शक्तीच वरखाली पसरलेली होती. नव्हे नव्हे सर्वांपलिकडे तीच होती. वायूच्या खालवर, आतबाहेर फार काय सर्वांपलिकडे वायूशिवाय दुसरे काही नव्हतेच. ही एक विश्वव्यापी अतंर्बाह्य अशी अमोघ शक्ति आहे. ती लपून राहिली की दृश्य, ती प्रगट झाली की दृश्याचा निरास. ती शून्यभूत झाली की जडत्व, ती प्रकर्षाने चाळवली की केवळ चैतन्य अशी मोठी यात जादू आहे.

### ऋचा ६ वी

**को अद्धा वेद क इह प्रवोचत्**
**कुत अजाता कुत इयं विसृष्टि: ।**
**अर्वागदेवा अस्य विसर्जनेना–**
**थ को वेद यत आबभूव ।।६ ।।**

(सत्‌चा) हा विसर्ग म्हणजे पसारा कशापासून किंवा कोठून आला हे खरेखुरे (अद्धा) कुणाला माहित आहे. (को वेद) ? या जगात (इह) हे कोण सांगतो ? देव सुध्दा (जगाच्या) उत्पत्तीच्या (विसर्जन) नंतरचे (अर्वाक्) आहेत. मग ही सृष्टि जेथून उत्पन्न झाली (आबभूव) ते कोण जाणतो ?

**भावार्थ स्पष्टीकरण :**

ही विज्ञानात्मक सृष्टि (विसृष्टि) वैचित्र्यपूर्ण अशी कोठून आली ? आम्हाला या सृष्टिचे ज्ञानच नाही. मग ती असून काय करावयाची ? एखादा जागा झाला तर त्यावेळी एखादा स्वप्नात असतो. मग ती स्वप्न सृष्टि एखाद्याला असती व एखाद्याला नसती. जे कोणी परलोकवासी झाले, त्यांना आज ही सृष्टि नाही. आम्हाला आहे. आम्ही जर हा लोक सोडला, तर येथे जे भरती करतील त्यांना ही सृष्टि आहे व आम्हाला नाही. हा आहे-नाही चा साक्षात्कार ज्याचेवर घडतो, ज्याचेमुळे आम्हाला या सृष्टिचा साक्षात्कार होतो, ते जे आत्मतत्व तेथेच सृष्टीचा उगम आहे. तो आत्मा आम्हाला ज्या अवस्थेत नेतो ते दृश्य दाखवतो. अवस्थेमुळे दृश्य, दृश्यामुळे अवस्था नाही. आत्म्यामुळे अवस्था, अवस्थेमुळे आत्मा नाही. आत्म्यामुळे ज्ञान, ज्ञानामुळे आत्मा नाही. पण जर मढ्याची राख होऊन पडली, तिलाच जर चेतना आली, तर तेथेही विज्ञान सृष्टिचा चमत्कार निश्चित आहे. हे जे आहे आणि नाही हे सर्व सापेक्ष ज्या निरपेक्ष आत्म्यामुळे अनुभूतीला येते, ती जी अंतिम आत्मसत्ता, तेथूनच ही सृष्टि झाली. आम्ही झोपी गेलो की या दृष्याचा लय होतो व जागे झाले की हे दृश्य आमचे डोळ्यासमोर येते. हा दैवी चमत्कार आहे आणि तो आम्ही रोज अनुभवतो. वायू प्रगट होऊन त्यात दृश्याचा लय झाला की ते असून नसल्यासारखे होते. तोच वायू आकसला की अवस्थांतर होऊन, त्या वायुमुळे निर्माण झालेली ही जडसृष्टि आमचे चर्मचक्षू समोर थैमान घालते.





अर्थात् ही सृष्टि वायूच्या अंगभूत आहे, हा त्याचे हातचा मळ आहे. मग ही सृष्टि रोज जेथे विलीन होते, तेथूनच ती निर्माण झाली हे तर अगदी उघडच आहे. वायूचे ठिकाणी तेज आहे, पाणी आहे, जडत्व , हलकेपणा आहे. ऐकणे, बोलणे, स्पर्श होणे, खाणे-पिणे, रक्त बनून वाहणे, बुडणे-तरणे, डोळ्यांची उघडझाप, संधि साफ करणे (ठेवणे) हे सर्वच जर त्याचेमुळे साक्षात्काराला येते, तर त्याचा पत्ता देवांना तरी कसा लागावा ? कारण ते सृष्टिच्या नंतरचेच आहेत. वायुरूप, द्रवरूप, घनरूप असा प्रत्येक पदार्थ आहे. स्थित्यंतर, अवस्थांतर, रुपांतर हे सर्व त्याचेमुळेच होते. तो मात्र आत्मत्वाने आहे तसाच असतो. म्हणून जड वायूत त्याची गणना केल्यास फसगत होईल. ज्याचे योगाने ज्ञान निर्माण झाले, त्याची सिध्दी ज्ञानाने व्हावी कशी ? असे जर आहे, तर हे कसे निर्माण झाले हे त्याचे शिवाय या जगात कोणाला माहित असणार ? अर्थात् त्यानेच आम्हाला हे दिव्य ज्ञान व्हावे असे योजिले, तर तोच नादरूपाने या गोष्टी आमचे कानात सांगेल खास. पण हे इतर प्राणिमात्रांचे काम नव्हे. अर्थात् ही सृष्टि जेथून उत्पन्न झाली ते एक तोच जाणतो किंवा या आत्मतत्वाला जाणून जे महात्मे आत्मरूप झाले, तेच एक या आत्मप्रचीतीने हे जाणू शकतात. तथापि या आत्मत्वाची ओळख न होता जे जडाशी समरस झाले ते जडवादी. हे सर्व कशाचे बनले आहे, याची ज्यांना ओळखच नाही, काय बनले आहे यावरच ज्यांची सृष्टि आहे, त्यांना येथे संपूर्ण अंधारच आहे. तर ते जाणतील काय ? वायूचे अंगीच हे जाणण्याची जाणीव आहे. वायूमुळेच वायूला जाणता येते. सूर्य प्रकाशानेच सूर्याला पहावे लागते. वाऱ्यात वारे कसे मिसळावे हे ज्यांना साधले त्यांनाच हे पटेल. एरव्ही विचारांचे गोंधळाशिवाय हाती काय येणार ?

## ऋचा ७ वी

**इयं विसृष्टिर्यत आ बभूव**
**यदि वा दधे यदि वा न ।**
**यो अस्याध्यक्ष: परमे व्योमन्**
**सो अंग वेद यदि वा न वेद ।।७।।**

**अर्थ :**

ही विविध सृष्टि जेथून निर्माण झाली (त्याने) ही निर्माण केली (दधे) किंवा केली नाही (न दधे) (किंवा त्याने हिला आधार दिला किंवा दिला नाही), हे परम आकाशात राहणारा (परम व्योमन्) याचा (अस्य) अध्यक्ष (हिरण्यगर्भ) त्याला तरी माहित असेल अगर नसेल.

भावार्थ स्पष्टीकरण :

ही सृष्टि आत्मत्वाचे ठिकाणी सहजच प्रतीत होत आहे. आत्मत्व हेच त्यांचे अधिष्ठान आहे. त्यामुळे ही सृष्टि त्या आत्म्याने निर्माण केली अगर केली नाही, या म्हणण्याला तादृश्य अर्थ नाही. हिला आधार दिला अगर दिला नाही, हे म्हणणेही तसेच आहे. कारण ही सृष्टि त्या आत्मशक्तीचा सहज चमत्कार आहे. ही आत्मशक्ति म्हणजे सूर्य आहे. म्हणून सूर्य आत्मा जगतस्त-स्थुषश्च असे वेदाने म्हटले आहे. अनंत जीव त्यांचेमुळे जगले आहेत. किडा मुंगीही त्याविना जिवंत राहणार नाही. पण त्याचे गांवी तरी ही गोष्ट आहे का ? तसेच हा जो परम आकाशात राहणारा अधिष्ठानरूप अध्यक्ष त्याचा हा एक सृष्टि म्हणजे सहज चमत्कार आहे. त्याचे ठिकाणी कल्पनाही नाही. अशीच ती निर्विकल्प मूलभूत आत्मस्थिती आहे व त्याठिकाणी सूक्ष्मतम ज्या लहरी





आहेत, त्याचा परिणाम म्हणजे या विश्वाची रचना आहे.

हे नासदीय सूक्त फार प्रसिध्द आहे. ऋग्वेदकाळी तत्वज्ञानासंबंधी काय प्रकारची विचारसरणी होती, ऋषिप्रणीत कोणता मार्ग ईश्वर साक्षात्काराचा होता, त्यांनी कसा अभ्यास केला, त्यांचे कानावर काय प्रकारचे मंत्र ईश्वर कृपेने आले, त्याला श्रुति का म्हणतात, हे या सूक्तावरून चांगलेच स्पष्ट होते. ईश्वरप्रणीत वेदमार्ग असलेने या वाङ्मयाला अद्वितीयत्व प्राप्त झाले आहे.

आमचे भगवान् श्री सद्गुरु श्री निंबरगीकर महाराज यांचे संप्रदायातील तत्वज्ञान व उपासना पध्दती ही ऋषिप्रणीतच आहे. याच प्रकारे श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज, श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर तथा चिमड महाराज, श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस व माझे प. पू. पितृदेव श्रीमामामहाराज केळकर यांनी उपासना केली व आत्मानुभव संपादन केला आणि हाच आदर्श साधकांसमोर ठेवला. त्यांचे अनन्य भावाने स्मरण करून, या गुरुपरंपरेतून या महात्म्यांचे कृपेने या नासदीय सूक्तावरील उत्स्फूर्त भावार्थ सांप्रदायिक दृष्टिने आम्हा साधक वर्गाला मार्गदर्शी होऊन, हा प्रकाश आमची आयुष्याची वाटचाल होत असताना आम्हास सतत प्राप्त व्हावा अशी प्रार्थना करून, चि. केशव वामन आपटे, एम. ए. पी.एच्.डी. यांनी लिहिलेल्या नासदीय सूक्ताचे अर्थावर हा गुंफलेला भावार्थ त्या प्राणेश्वरास समर्पण करीत आहे.

सांगली. **दासराम**

दि. ६-१०-६८

# नासदीय सूक्त - विवरण

(श्रीदासराममहाराजकृत भावार्थावरील विवरण)

## प्रकरण क्र. २

## नासदीय सूक्त : विवरण

१) वेदवाङ्मयाचे महत्व

२) नासदीयसूक्तातील विषय

३) नासदीयसूक्तातील तत्वज्ञान

४) नासदीयसूक्ताची वैशिष्ट्ये

## १) वेदवाङ्मयाचे महत्व

आपला वेदकाल हा इसवीसनपूर्व तीन हजार वर्षे ते पाच हजार वर्षे मानतात. परंतु वेदकालाबाबत एकवाक्यता दिसून येत नाही. वेद हा शब्द विद् म्हणजे जाणणे, ज्ञान या धातूपासून उत्पन्न झाला असून त्याचा अर्थ 'ज्ञानाचा संग्रह' असा केला जातो. वेदांना 'श्रुति' असेही म्हणतात. श्रुति म्हणजे परमेश्वरापासून ऐकू आलेले ज्ञान. वैदिक ऋषींच्या अनुभूतीचा प्रगत आविष्कार म्हणून उपनिषदे निर्माण झाली. भारतीय परंपरेमध्ये सांख्य,योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा आणि उत्तर मीमांसा (वेदांत) अशी सहा दर्शने असून या सर्व दर्शनांचे मूळ वेद आहे. मानवाचे प्रथम चिंतन असलेल्या वेदांच्यामधूनच पुढे उपनिषदे व सहा दर्शनांची जडणघडण झाली आहे. वेदामध्ये आलेल्या अनेक विषयांची तर्कशुध्द मांडणी दिसत नसली तरी स्वयंस्फुरणातून आलेला हा अनुभव असल्याने त्याचे महत्व अनन्यसाधारण आहे.

ऋग्वेद, अथर्ववेद, सामवेद व यजुर्वेद असे चार वेद आहेत. वेदांच्या मूलमंत्रांना 'संहिता' असे म्हणतात. वेद म्हणजे ज्ञान संहितांचा संग्रह होय. चारही वेदांच्या संहितांच्या निरनिराळ्या शाखा आहेत. चारही वेदात 'ऋग्वेद' हा अत्यंत प्राचीन वेद आहे. जगातील सर्वात पुरातन ग्रंथांपैकी एक असा हा ग्रंथ आहे. ऋग्वेदाचा क्रमांक संपूर्ण मानवजातीच्या उपलब्ध वाङ्मयात पहिला लागतो. हा ग्रंथ काव्य स्वरुपात आहे. यामध्ये असलेल्या ऋचा किंवा सूक्ते यांची विभागणी दहा मंडलात करण्यात आली आहे. यामधील काव्यरचना मुख्यत: गायत्री छंदात आहे. याची रचना वसिष्ठ, भारद्वाज, पराशर, जमदग्नी इत्यादी ऋषींनी केली आहे. यामध्ये तेहतीस मुख्य देवतांचे वर्णन आहे. यावरुन तेहतीस कोटी देव (म्हणजे तेहतीस प्रकारचे देव) आहेत





असे म्हटले जाते. यामध्ये स्त्रियांनी रचना केलेली अशी सव्वीस सूक्ते आढळतात.

वेदग्रंथात अनेक विषय आलेले आहेत. यामध्ये वैदिक देवतांची स्तुती असणाऱ्या काव्यरचना आढळतात. विश्वाच्या मूळकारणाचा शोध वैदिककाळातच सुरु झालेला होता. ऋग्वेदातील पुरुषसूक्त, नासदीयसूक्त अशा कांही सूक्तामधून तत्वज्ञानाच्या चिंतनाला सुरुवात झालेली होती. परंतु या तत्वचिंतनाला निश्चित अशा सिध्दांताचे स्वरुप प्राप्त झालेले नव्हते. पुढे उपनिषदांच्या काळामध्ये ह्या तत्वचिंतनाला निश्चित असे स्वरुप प्राप्त होऊ लागले. विश्वाच्या मूळकारणाला 'ब्रह्म' ही संज्ञा प्राप्त झाली. वेदांच्या 'एकम् सत्' या संदेशातून अद्वैत वेदांताची प्रेरणा पुढे विस्तारत गेली. अशातऱ्हेने भारतीय तत्वज्ञानाची पायाभरणी वेदवाङ्मयांनी केली.

## २) नासदीयसूक्तातील विषय

ऋग्वेदातील कांही सूक्तामधून तत्वचिंतनाला सुरुवात झालेली होती. नासदीयसूक्तामध्ये अशा तत्वचिंतनाचा आविष्कार दिसून येतो. विश्वाची निर्मिती कशी झाली असावी याविषयाचे चिंतन करणारे हे नासदीयसूक्त प्रसिध्द आहे. ऋग्वेदातील दहाव्या मंडलातील १२९ वे हे सूक्त 'नासदीयसूक्त' म्हणून ओळखले जाते. या सूक्ताला 'नासदीय सूक्त' असे नाव पडण्याचे कारण म्हणजे या सूक्ताची सुरुवात 'नासदीसीत् .....' अशी आहे. सृष्टिक्रमाच्या विवेचनार्थ यामध्ये एकूण सात मंत्र आहेत. या सूक्ताचा द्रष्टा ऋषी परमेष्ठी प्रजापती असून परमात्मा देवता आहे.

वेदकाळातील मानवाला पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश रुपाने सभोवार परसलेला निसर्ग दिसत होता. सूर्य, चंद्र व तारे तसेच भोवतालच्या

निसर्गाचा मनोहर तसेच रौद्र देखावा दिसत होता. निसर्गातील ह्या सर्व घटकांमुळे आपले जीवन सुव्यवस्थितपणाने चालले आहे याची त्यांना जाणीव होती. निसर्गातील हे सर्व घटक देव आहेत, त्या सर्वांनी आपल्या जीवनाचे रक्षण करावे, पोषण करावे असे त्यांना वाटत होते. प्राचीन आर्य निसर्गशक्तीच्या सान्निध्यात जीवन जगत होते. निसर्गशक्तीवर त्यांचे दैनंदिन जीवन अवलंबून होते. या निसर्गशक्तीच्याबाबत त्यांच्या मनात काहीसे आश्चर्य व कांहीशी भीती निर्माण झाली. त्यामधूनच या मानवसदृश्य शक्तीलाच नंतर त्यांनी 'देवता' असे नाव दिले व त्यांची पूजा चालू केली. या देवता प्रसन्न व्हाव्यात, त्यांची कृपा संपादन करावी या हेतूने ह्या देवतांच्या स्तुतीपर व भक्तीपर अशी अनेक स्तोत्रे वेदामध्ये आलेली आहेत. ह्या देवता संख्येने जरी अनेक असल्या तरी त्यांच्यामध्ये इंद्र, वरूण, अग्नी यांच्यासारख्या कांही देवतांना अधिक महत्व दिल्याचे दिसून येते. त्यानंतर त्यांच्या लक्षात आले की या विश्वामध्ये काही व्यवस्था आहे. जे कांही घडते ते काही ठराविक नियमाने घडत आहे. दिवस-रात्र, भरती-ओहोटी अशी अनेक चक्रे निसर्गामध्ये नियमितपणाने चालू आहेत. तेच तेच ऋतू नियमाने परत येतात. याचा अर्थ विश्वामध्ये एक सुनियंत्रित रचना आहे, एक शिस्त आहे. हे सर्व अवलोकन करून, ह्या सर्वांचा अर्थ काय व याचे खरे मूळकारण कोणते ? ही अद्भूत सृष्टि कशी उत्पन्न झाली यासारख्या तात्विक विचारांना सुरुवात झाली. नासदीयसूक्त हे अशा तात्विक विचारांचा आविष्कार आहे.

नासदीयसूक्तामध्ये बीजरूपाने आलेल्या विषयांचा विस्तार पुढे उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्रे आणि इतर अनेक दर्शनग्रंथांमधून झालेला आहे. उपनिषदांमध्ये आत्मजिज्ञासेकडे अधिक लक्ष दिले आहे. भोवतालचे जग व मानवी जीवन यांचा सखोल विचार यामध्ये आलेला आहे. उपनिषदांमध्ये





बुध्दिप्रधानता असून त्यामध्ये सर्व तात्विक विचारांची चिकित्सक पध्दतीने चर्चा केलेली आहे हे जरी खरे असले तरी, वेदकालीन मानवामध्येही ब्रह्मजिज्ञासा उत्पन्न झालेली होती. - ''ह्या सृष्टीच्या मुळाशी असलेले आधारभूत तत्व कोणते ?'' - याचा विचार करणारी सूक्ते ऋग्वेदामध्ये आढळतात. नासदीयसूक्तामध्येही हाच विषय प्रामुख्याने आलेला आहे. यामध्ये 'विश्वाची निर्मिती' या गूढ व व्यापक विषयावरचे चिंतन आहे. सृष्टीनिर्माणशास्त्राची पायाभरणीच या सूक्ताने केली आहे. अव्यक्त अशा एका तत्वापासून व्यक्त जगत् उत्पन्न झाले आहे असा या सूक्ताचा थोडक्यात आशय आहे. त्या अव्यक्त 'तत् एकम्' चे स्वरुप कसे होते ते या सूक्ताच्या दुसऱ्या ऋचेमध्ये स्पष्ट केले आहे. सारांशाने सांगायचे झाल्यास एक ते तीन ऋचेमध्ये विश्वनिर्मितीच्या आधीच्या स्थितीचे वर्णन आले आहे, चार व पाच या दोन ऋचेमध्ये त्या 'तत् एकम्' चा सृष्टीरूपाने कसा विस्तार झाला हे सांगून सहाव्या व सातव्या या शेवटच्या दोन ऋचेमध्ये या सर्व विश्वनिर्मितीच्या मागे जो कोणी असेल त्यालासुध्दा हे रहस्य विस्ताराने सांगता येणार नाही असे म्हटले आहे.

विश्वाकडे पाहण्याचे दोन भिन्न दृष्टिकोन आहेत. एक जडवादी व दुसरा अध्यात्मवादी. विश्वातील सर्वच घटना नियमबध्द पध्दतीने घडताना आढळतात. अशा घटनांमध्ये एक प्रकारची आंतरिक शिस्त व सुसंवाद दिसतो. ही नियमबध्दता यांत्रिक स्वरुपाची आहे. येथे कोणाच्या इच्छेचा वा अनिच्छेचा संबंध नाही. अशा प्रकारची विचारसरणी असणारे जडवादी होत. अध्यात्मवादी अशा प्रकारची विचारसरणी नाकारतात. अध्यात्मवादी मानतात की जडता हे सृष्टीचे खरे रूप नव्हे. विश्वाच्या अंतर्यामी असलेल्या जाणीवेने घेतलेले हे पांघरूण आहे. विश्वाच्या अंतर्यामी चैतन्य आहे. या

चैतन्याच्या अधिष्ठानावर विश्वातील घटना नियमबध्द पध्दतीने घडू शकतात. भौतिक विश्वाची जडता हा केवळ आभास आहे. जे कांही या विश्वात आहे तो सर्व चैतन्याचा विलास आहे.

भारतीय तत्वज्ञान हे अध्यात्मवादी आहे. नासदीयसूक्तात सृष्टीच्या प्रकटीकरणासाठी ''तत् एकम्'' ने मन धारण केले असून त्या प्रकटीकरणामागे 'काम वा इच्छा' असल्याचे म्हटले आहे. मन आहे तेथे बुध्दी आहे. मन व बुध्दी हे जाणीवेशिवाय असणे शक्य नाही. अशा तऱ्हेने 'तत् एकम्' म्हणजेच 'सत् ब्रह्म' रूपाने एक विराट बुध्दीची अथवा जाणीवेची संकल्पना मांडली गेली आहे. सत्चे अस्तित्व हे चिद्शी अतिशय निगडीत आहे. अशा तऱ्हेने जडवादाचा निरास करून अध्यात्मवाद व चिद्वाद यांची प्रस्थापना करणारा नासदीयसूक्तातील विषय अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे.

## ३) नासदीयसूक्तातील तत्वज्ञान

तत्वज्ञानाच्यादृष्टीने हे नासदीयसूक्त अत्यंत महत्वाचे आहे. सभोवताली पसरलेल्या गूढ आणि आश्चर्यकारक सृष्टीला पाहून मनात अनेक प्रश्न उद्‌भवणे आणि त्यासंबंधी विचार करणे ही मानवाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. काही लोकांना हे विश्व म्हणजे अणूंचे हेतुशून्य भ्रमण वाटते. परंतु हे विश्वाचे खरे स्वरुप नाही. विश्वामध्ये सतत घडत असणाऱ्या सर्व घडामोडीत काही योजना दिसते, डोळसपणा दिसतो. सृष्टीत अनेक गोष्टी दिसतात, अनेक घडामोडी घडत असतात. असे असले तरी त्यांच्यामध्ये संबंध आहेत. हे संबंध आंतरिक स्वरुपाचे असतात. आंतरिक संबंधांच्या या विचाराची दिशा 'अंतिमत: वस्तू एकच आहे (एकतत्ववाद)' या सिध्दांताकडे निर्देश करते. अशा या रहस्यमय सृष्टीच्या निर्मितीच्यापूर्वी कशाचे अस्तित्व होते हा मोठा गूढ प्रश्न आहे. नासदीयसूक्तात देखील (ऋचा सहा व सात) ऋषी आश्चर्याने





म्हणतात,-''हा सृष्टीचा पसारा कोठून आला ? कशापासून झाला, हे निश्चितपणे कोण जाणतो ?''- अशा प्रकारच्या गूढ प्रश्नांच्या शोधातूनच या सूक्ताची निर्मिती झाली. एकूण सात ऋचा असलेल्या या सूक्ताचे विवेचनाच्या दृष्टीने एक ते तीन ऋचांचा पहिला, चार व पाच ऋचांचा दुसरा आणि सहा व सात ऋचांचा तिसरा असे तीन विभाग केलेले आहेत. विवेचनाच्याआधी डॉ. के.वा. आपटे यांनी त्याचा केलेला अन्वयार्थ दिलेला आहे.

**अ) ऋचा १ ते ३ (अन्वयार्थ) :**

''- तेव्हा म्हणजे अगदी आरंभी असत् नव्हते आणि सत् ही नव्हते, अंतरिक्ष नव्हते आणि त्यापलिकडील जे आकाश तेही नव्हते. (अशा परिस्थितीत) कोणी कोणाला आवरण घातले ? कोणाच्या सुखासाठी (तेथे) अगाध, गूढ असे पाणी तरी होते काय ? -'' **(ऋचा १)**

''- तेव्हा (तर्हि) मृत्यू नव्हता, अमृत नव्हते, रात्र आणि दिवस यांचा भेद करण्याचे साधन वा चिन्ह (प्रकेत) नव्हते. ते एक आपल्या स्वसामर्थ्याने (स्वधया) वा स्वेच्छेने वायुशिवाय (अवातं) श्वासोच्छ्वास करीत होते. (आनीत्) स्फुरत होते. त्याखेरीज किंवा त्या पलिकडे दुसरे असे कांहीच नव्हते.-'' **(ऋचा २)**

''- अंध:कार होता. आरंभी अंध:काराने झाकलेले पाणी होते किंवा आरंभी अंध:काराने अंध:कार झालेला होता. हे सर्व (इदं सर्वम्) चिन्ह विरहित (अप्रकेत) सलिल (पाणी) होते. जे आभु (सर्व व्यापी, प्रादुर्भूत होणारे), तुच्छाने म्हणजे फोल आकाशाने आच्छादिलेले होते (अपिहित), ते एक तपाच्या महिम्यामुळे (महिमा) प्रादुर्भूत किंवा निर्माण झाले, प्रगट झाले (अजायत). -'' **(ऋचा ३)**

**विवेचन :**

वरील तीन ऋचांमधून संपूर्ण विश्वाच्या निर्मितीला अधिष्ठानभूत अशा 'ते एक' (तत् एकम्) चा उल्लेख असून त्याच्या स्वरुपाचाही निर्देश करण्यात आलेला दिसून येतो. तसेच सृष्टीनिर्मितीच्या आधीच्या स्थितीचे वर्णन यात आलेले आहे. यातील 'ते एक' (तत् एकम्) या संकल्पनेमुळेच पुढे तत्वज्ञानाचा विस्तार सुरु झाला.

तत्वज्ञान हा एक सामासिक शब्द आहे. तत्वज्ञान हा शब्द 'तत्व' आणि 'ज्ञान' या दोन शब्दांपासून बनलेला आहे. यातील 'तत्व' हा शब्द 'तत्' आणि 'त्व' या दोन शब्दांच्या संधीमधून तयार झालेला आहे. 'तत्' या शब्दाचा अर्थ 'ते' (it) असा असून 'त्व' हा शब्द 'पणा' (ness) उदा. चांगुलपणा .... या अर्थाने आलेला आहे. यावरून तत्व या शब्दाचा अक्षरश: अर्थ 'ते पणा' (itness) असा होतो. तत् चे सार म्हणजे तत्व. या सूक्तामध्ये आलेल्या 'तत् एकम्' चे ज्ञान म्हणजे तत्वज्ञान. 'तत् एकम्' चे अस्तित्व, त्याचे वास्तव स्वरुप, त्याचे सार काय अशा तऱ्हेच्या व्यापक प्रश्नांचा उहापोह यामध्ये घेता येतो.

'ते एकले एक'- (तत् एकम्) स्वशक्तीने वायूशिवाय श्वासोच्छ्वास करीत होते - असे त्याच्या स्वरुपाचे वर्णन दुसऱ्या ऋचेमध्ये आलेले आहे. ऋग्वेदातील इतर अनेक सूक्तामध्ये एखाद्या देवतेचे नाव येते. ते नाव पुल्लिंगी (उदा. तो इंद्र) अथवा स्त्रीलिंगी (उदा. ती उषस्) असे असते. परंतु या सूक्तात मात्र प्रथमच 'ते एक' असा नपुसकलिंगी निर्देश आलेला आहे. तसेच तिसऱ्या ऋचेमध्ये - ''ते एक तपाच्या सहाय्याने प्रकट झाले - '' असा उल्लेख आलेला आहे. त्या तत् एकम् ला 'आभु' असे म्हटले आहे. आभु चा अर्थ





सर्वत: असणारे, सर्व सामर्थ्यवान असे 'अखंड अस्तित्व' या अर्थाकडे सर्वसाधारणपणे निर्देश करणारा आहे. अशा 'आभु' चे स्वरुप तुच्छाने झाकले आहे. म्हणून आम्हास त्याचे अज्ञान आहे. उत्तर वेदांत ग्रंथात तुच्छ म्हणजे 'माया' असा अर्थ होतो.

सृष्टी उत्पन्न व्हावयाच्या आधीच्या स्थितीसंबंधीचा विचार करताना - ''त्यावेळी कांही होते असे म्हणता येत नाही व कांही नव्हते असेही म्हणता येत नाही - '' असे वर्णन पहिल्या ऋचेमध्ये आले आहे. सृष्टीच्या आधी 'सत्' नव्हते, 'असत्' नव्हते, अंतरिक्ष नव्हते आणि त्यापलीकडील आकाशही नव्हते. 'तत् एकम्' चे स्वरुप विशद करताना सत्-असत्, आहे-नाही, असे द्वंद्वात्मक विचार पुरे पडत नाहीत. सत् नव्हते याचा अर्थ त्या 'तत् एकम्' च्या असणेपणाचे वर्णन विशिष्ट अशा प्रकारानी करता येत नाही. विशिष्ट प्रकाराने त्याला 'लक्ष' केले जाऊ शकत नाही. त्याच्या असण्याचा 'अमुक एक' म्हणून प्रकार नव्हता. 'तत् एकम्' ला कोणतेही विधेय वापरले तरी ते अपुरे पडते. जे कोणते विधेय आपण वापरु तेवढ्या अंशाने त्याला मर्यादा पडणार आहे. बरे त्यास 'असत्' म्हणावे तर तेही शक्य नाही. कारण 'ते' स्वत:च्या सामर्थ्याने स्फुरत होते असे वर्णन आहे. त्यामुळे त्याला 'असत्' ही म्हणता येत नाही. अशा प्रकारे 'ते' सत्-असत् या विचारधारेने मर्यादित होत नाही.

त्यावेळी फक्त अंधार, अगदी गाढ अंधार होता. त्यावेळी प्रकाश नव्हता म्हणूनच त्याला केवळ अंधार म्हणायचे. त्यावेळी प्रकाश तर कसा असणार ? कारण सर्वांना प्रकाश देणारा सूर्यच अजून उत्पन्न झालेला नव्हता. प्रकाश आणि अंधारच नाही तर रात्र व दिन यांचे वेगळेपणाचे लक्षण पण असणार नाही. रात्र व दिवस यामधील अंतर कळण्यास कोणतेही साधन नव्हते. त्यावेळी मृत्यू नव्हता आणि अमृतत्वही नव्हते. याचा अर्थ मृत्यू म्हणजे

मर्त्यसृष्टी नव्हती. त्यामुळे त्याच्याविरोधी 'अमृत' किंवा मृत्युरहित असाही पदार्थ नव्हता. अशा शून्यवत् अवस्थेत 'ते' एकटे स्थिरपणे वायूशिवाय स्फुरण पावत होते. अशा या तत्वालाच 'अंतिम सत्ता' हा अर्थ प्राप्त झालां. या 'तत् एकम्' या तत्वालाच भारतीय विचारवंतांनी 'ब्रह्म' ही संज्ञा दिली. हे ब्रह्म सत्‌रूप आहे. येथे सत् हे सत्-असत् अशा भेदात्मक अर्थातून आलेले नाही. किंवा असत् नव्हे ते सत् अशा सापेक्षतेनेही आलेले नाही. हे ब्रह्म केवळ अस्तित्वरुपाने असणारे असे आहे. म्हणून ते निखळ सत्तारूप आहे. जे जे अस्ति = आहे, असे अनुभवाला येते ते ते सर्व 'सत्' अंशानी युक्त आहे. अस्तित्व हाच ब्रह्माचा सत् अंश होय. अशा तऱ्हेने ऋचा एक ते तीन मध्ये विश्वनिर्मितीच्या आधीची स्थिती सांगून या विश्वाच्या मुळाशी असलेल्या एकमेवाद्वितीय अशा 'तत् एकम्' अशा सत्‌ब्रह्माची सिध्दी केलेली आहे.

**ब) ऋचा ४ व ५ (अन्वयार्थ )**

'' -मनाचे जे रेत म्हणजे बीज आरंभी (अग्रे) निघाले तोच काम (म्हणजे सृष्टि निर्माण करण्याची प्रवृत्ती किंवा शक्ती) झाला आणि (हा काम म्हणजे) असत् मध्ये (असति) सत्‌चा संबंध (बंधू) होय असे (आत्म-)ज्ञानी पुरुषांनी (कवय:) अंत:करणात (हृदि) विचार करून (प्रतीष्या) बुध्दीने (मनीषा) निश्चित केले (निरविन्दन) - '' **(ऋचा ४)**

'' - याचा किरण किंवा सूत्र (दोर) (एषांरश्मि:) तिरका/आडवा (तिरश्चीत) पसरला (वितत:) आणि खाली होता म्हटले तर वरही होता. (अध: उपरि) त्याच्यातील काही बीजप्रद (रेतोधा:) झाले व वाढून मोठेही झाले. त्याचीच स्वशक्ति (स्वधा) अलिकडे व पलीकडे व्यापून राहिली. - ''

**(ऋचा ५)**





**विवेचन :**

ऋचा चार व पाच मध्ये प्रामुख्याने विश्वनिर्मितीची प्रक्रिया कशी झाली याचे वर्णन आहे. तिसऱ्या ऋचेमध्ये - ''हे सर्व अंध:काराने व्याप्त एकजिनसी पाणी होते. - '' असे म्हटले आहे. परंतु त्याचा प्रतिवाद चौथ्या ऋचेमध्ये आलेला आहे. सृष्टीचे मूळ कारण जे 'तत् एकम्' हे पाणी किंवा इतर पाण्यासारखे एखादे जड द्रव्य नव्हते तर मनाच्या बीजापासून त्याची उत्पत्ति झाली असे प्रतिपादन केलेले आहे. स्वत:च्या शक्तीने जे अस्तित्वात होते स्वत:च्या शक्तीने जे अस्तित्वात होते व स्फुरण पावत होते, त्याला अन्य कशाचीही गरज नव्हती. ते अन्य कशावरही आधारित नाही. हे विश्व तपाच्या महिम्याने प्रगट झाले. तप हा सूत्रात्मक शब्द आहे. स्फुरणामुळे लहरी ह्या अंतरिक्षामध्ये व्यापल्या गेल्या. त्यातील उष्णतेमुळे म्हणजेच तपामुळे विश्व उत्पन्न झाले. या निर्मिलेल्या सृष्टीत परस्परांचे पोषणही तपानेच होते .म्हणजेच विश्वाचे निर्माण, त्याचे तारण व पालनपोषण यांचे उगमस्थान 'तपच' आहे.

तपामुळे त्या 'तत् एकम्' चे दृश्य, सृष्टीमध्ये प्रगट झाले. या प्रक्रियेच्या मागे 'काम अथवा इच्छा' होती. मनाच्या निर्मितीच्या मागे 'इच्छा' हे सूक्ष्म बीज आहे. 'तत् एकम्' ने मन धारण केले. आता ते 'आत्मवान' झाले. त्याने मनात भावरुपाने सृष्टीची निर्मिती केली. 'तत् एकम्' जेव्हा दृश्य सृष्टीत प्रकट झाले त्यामुळे असत्‌चा सत् शी धागा जोडला गेला. येथे असत् व सत् हे अव्यक्त व व्यक्त या अर्थाने आले आहे. 'योगवशिष्ठ' या ग्रंथामध्ये जगाची उत्पत्ति व त्याचे स्वरुप ह्याला 'मन'च कारणीभूत आहे असे सांगितले आहे. ''मनोमात्रमिदं जगत्'' हा मनोमयतावादच योगवशिष्ठामध्ये प्रामुख्याने मांडलेला आहे.

पाचव्या ऋचेमध्ये 'तत् एकम्' च्या विश्वरुपात झालेल्या विस्ताराचे वर्णन आहे. त्याचा पसारा विश्वामध्ये उभा, आडवा, वरती व खाली असा सर्वत्र पसरलेला आहे. त्याही पलीकडे तो व्यापून आहे. 'ते' निरावयव असूनही विश्वाच्या उत्पत्तीचे कार्य स्वशक्तीने सुरु झाले. ते 'शक्तीतत्व' च सर्वत्र किरणाप्रमाणे पसरले आहे. विश्वाच्या उत्पत्तीसाठी वेगळ्या आश्रयाची गरज नाही. तेच सर्वकाही व्यापते. त्याच्याच स्वशक्तीचा अविर्भाव म्हणजे हे जगत् होय. 'तत् एकम्'च सर्वांगाने, सर्वत्र स्वत:च अभिव्यक्त होते. याठिकाणी 'कारण' हे 'कार्याच्या' अतीत रहात नाही. येथे सृष्टीचे आदिकरण सत्ब्रह्म व सृष्टी यांच्या संबंधांमध्ये परकेपणा नाही. येथे 'तत् एकम्' आणि त्याचे विकसित कार्य म्हणजे जगत् यांच्यामध्ये भेद नाही.

**क) ऋचा ६ व ७ (अन्वयार्थ) :**

'' -(सत्चा) हा विसर्ग म्हणजे पसारा कशापासून किंवा कोठून आला हे खरेखुरे (अद्धा) कुणाला माहित आहे. (को वेद) ? या जगात (इह) हे कोण सांगतो ? देव सुध्दा (जगाच्या) उत्पत्तीच्या (विसर्जन) नंतरचे (अर्वाक्) आहेत. मग ही सृष्टि जेथून उत्पन्न झाली (आबभूव) ते कोण जाणतो ?-''

**(ऋचा ६)**

''- ही विविध सृष्टि जेथून निर्माण झाली (त्याने) ही निर्माण केली (दधे) किंवा केली नाही (न दधे) (किंवा त्याने हिला आधार दिला किंवा दिला नाही), हे परम आकाशात राहणाऱ्या (परम व्योमन्) याचा (अस्य) अध्यक्ष (हिरण्यगर्भ) त्याला तरी माहीत असेल अगर नसेल.-'' **(ऋचा ७)**

**विवेचन :**

सहा व सात या सूक्तातील शेवटच्या दोन ऋचा आहेत. या सृष्टीचा





पसारा कोठून आला ? कशापासून झाला हे सर्व निश्चितपणाने कोण जाणतो ? हे सर्व सविस्तरपणाने कोण सांगू शकेल ?असे विचार सहाव्या ऋचेत आलेले आहेत. जगाची उत्पत्ति, स्थिती व लय हे ब्रह्मा, विष्णू व महेश हे तीन देव करतात असे मानले जाते. पण जगाचे मूळ ठरलेल्या ब्रह्मदेव किंवा विष्णूपूर्वी काय होते असा प्रश्न उत्पन्न होतो. जगत् निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाला कोणी उत्पन्न केले? याचाच अर्थ देव हे सृष्टीनंतरचे आहेत. निरुपाधिक सत्वस्तूला उपाधीनी ईश्वरता आली. त्यांना ब्रह्मा, विष्णू व महेश अशी नानारुपे प्राप्त झाली. त्यामुळे देवांनासुध्दा या प्रश्नाचे उत्तर देता येणार नाही.

अनादिकालापासून चालत आलेल्या सृष्टीचा नेमका विचार, नेमके रहस्य परमआकाशात राहणारा विश्वाचा अध्यक्ष जो हिरण्यगर्भ तरी जाणत असेल किंवा नसेलही असे सातव्या व शेवटच्या ऋचेमध्ये म्हटले आहे. व्यक्त ब्रह्माच्या मनाला 'हिरण्यगर्भ' म्हणतात तर त्याच्या शरीराला 'विराट' म्हणतात. अतिविशुध्द मन असलेला हिरण्यगर्भ - ब्रह्मदेव सृष्टी उत्पन्न करतो असे सर्वत्र वर्णन आहे. श्वेताश्वेतर उपनिषदामध्ये ब्रह्मा व हिरण्यगर्भ हे एकच आहेत असे म्हटले आहे. असा हा सृष्टीप्रपंचाचा अध्यक्ष जो हिरण्यगर्भ अथवा परमेश्वर सुध्दा या सर्वांचा उगम जाणत नसेल असे म्हटले आहे. अशा तऱ्हेने ऋषींनी आपली आग्रही भूमिका नसल्याचे नमूद केले आहे.

## नासदीयसूक्ताची वैशिष्ट्ये

नासदीयसूक्तामध्ये आलेल्या मूलभूत विचारांचा विस्तार पुढे उपनिषदे व अनेक ग्रंथामधून आलेला आहे. अनेक वैचारिक तत्वप्रणाली व सिध्दांत यांची, हे सूत्र 'जननी' आहे. त्यामुळे या सूक्ताची वैशिष्ट्ये सांगताना हा संदर्भ विचारात घेतला आहे.

१) अनेकातून एकत्वाकडे पाहण्याची भारतीय सनातन वृत्ती आहे. या वृत्तीचा उगम नासदीयसूक्तामध्ये दिसून येतो. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १२१ व्या हिरण्यगर्भसूक्तात ईश्वर एक आहे असे प्रतिपादन केलेले आहे. त्याच मंडलातील १० वे सूक्त हे प्रसिध्द 'पुरुषसूक्त' होय. अनंत मस्तके, अनंत डोळे इत्यादींनी युक्त असलेला एकच पुरुष सर्व जगाला व्यापून त्याच्या पलीकडे दहा अंगुळे उरला आहे, अशी कल्पना करून त्याच्या स्वरुपाचे रुपात्मक वर्णन आलेले आहे. यातील 'एका' ची कल्पना पौरुषेय (personal) स्वरुपाची आहे. यातून एकेश्वरवाद मांडला आहे. यापुढे जाऊन नासदीयसूक्तामध्ये 'तत् एकम्' या तत्वाचा उल्लेख आहे. या अपौरुषेय अशा 'एकालाच' वेदांतामध्ये 'ब्रह्म' म्हणून संबोधले आहे. वैदिक आर्यांनी अनेक देवतांची पूजा जरी मान्य केलेली असली तरी त्यांचा कल खऱ्या अर्थाने एकतत्ववादाकडे (monoism) झुकला होता याची साक्ष या नासदीयसूक्ताद्वारे प्राप्त होते.

२) 'तत् एकम्' ही सत्वस्तू अज्ञात आहे तशीच अज्ञेय आहे. कारण इंद्रियगम्य पदार्थाचेच ज्ञान शक्य आहे असे 'अज्ञेयवादी' मानतात. तैत्तिरीय उपनिषदातील मूळ कारण मानलेली 'असत्' ची कल्पना ही अज्ञेयात्मक आहे. त्याची बीजे नासदीयसूक्तात आहेत. या सृष्टीनिर्मितीचे ज्ञान सृष्टीनिर्मात्या ब्रह्माला/हिरण्यगर्भालाही होते किंवा नाही अशी सातव्या ऋचेमध्ये शंका प्रदर्शित केली आहे. या विचारामध्ये देखील अज्ञेयवादाच्या छटा दिसून येतात. श्रीगुरुदेव रानडे यांनी त्यांच्या 'उपनिषद्रहस्य' या ग्रंथामध्ये सृष्टीनिर्माणाच्या विषयाचा उहापोह करताना 'अज्ञेयवाद' या विषयाचा उल्लेख केलेला आहे. सहा व सात या दोन ऋचांमधून अशी शंका प्रदर्शित केली असल्याने येथे अज्ञेयवादाची बीजे दिसतात असे त्यांनी म्हटले आहे.

३) सांख्यदर्शन हे पुरुष व प्रकृती या दोन तत्वांच्या आधारावर जगाची





निर्मिती करु पाहते. सांख्यांच्या मते ही दोन तत्वे या व्यक्त जगाच्या निर्मितीमागे आहेत. म्हणून सांख्य 'द्वैतवादी' ठरतात. परंतू नासदीयसूक्तामध्ये केवळ एकाच ('तत् एकम्') एकमेवाद्वितीय तत्वाचा उल्लेख आहे. नासदीयसूक्ताप्रमाणेच पुढील अनेक उपनिषदांमध्ये ब्रह्मच विश्वरुपाने प्रकट होऊन सर्वत्र पसरले आहे असे सांगितले आहे. त्यामुळे सांख्यांच्या विश्वउत्पत्तिच्या कार्यकारणमिमांसेला तसेच द्वैतवादी भूमिकेला हे नासदीयसूक्त समर्पक उत्तर आहे.

४) नासदीयसूक्तामध्ये 'अद्वैत' सांगितले आहे. अद्वैताची स्पष्ट मांडणी उपनिषदामध्ये आलेली आहे. उपनिषदामध्ये 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म', 'अयमात्मा ब्रह्म', 'अहं ब्रह्मास्मि', 'प्रज्ञानं ब्रह्म' अशा महावाक्यांच्या मधून तसेच ब्रह्मसूत्रामधून अद्वैताची मांडणी केलेली आहे. नासदीयसूक्तामध्येही निर्गुणात्मक अपौरुषेय अशा 'तत् एकम्' ची कल्पना आली असून तेच विश्वरुपाने प्रकट होऊन सर्वत्र पसरते आहे असे म्हटले आहे. ही कल्पना अद्वैतवादाकडेच निर्देश करते. नासदीयसूक्तातील तिसऱ्या ऋचेमध्ये 'तत् एकम्' चे स्वरुप तुच्छाने झाकलेले आहे असा उल्लेख आहे. वेदांत तत्वज्ञानामध्ये प्रसिध्द असलेल्या 'मायावाद' या संकल्पनेचे बीज येथे दिसून येते. वेदांत ग्रंथामध्ये 'तुच्छ' म्हणजे माया असा अर्थ घेतला जातो.

५) भौतिक विज्ञानाच्या अभ्यासामध्ये प्रामुख्याने पृथ्वी-आप-तेज-वायू व आकाश या पंचमहाभूतांना प्राधान्य दिलेले दिसून येते. ऋग्वेदामध्ये अनेक ठिकाणी तसेच पुढे उपनिषदामध्येही या पंचमहाभूतांचा उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो. नासदीयसूक्तामध्येही जल-वायू असे उल्लेख आलेले आहेत. नासदीयसूक्तामध्ये आलेल्या विश्वनिर्मितीसंबंधीच्या कल्पनेचा उल्लेख भौतिक वैज्ञानिकांनीही केलेला आहे.

# नासदीय सूक्त - विवरण

(श्रीदासराममहाराजकृत भावार्थावरील विवरण)

## प्रकरण क्र. ३

## नासदीय सूक्त : भावार्थावरील विवरण (भाग १)


१) विश्वनिर्मितीपूर्व स्थिती (ऋचा १ व २)

२) आत्मतत्वाचे / जगताचे प्रकटीकरण (ऋचा ३)

३) विश्वनिर्मितीची प्रक्रिया (ऋचा ४)

४) विश्वाचे स्वरुप (ऋचा ५)

५) विश्वनिर्मितीचे रहस्य (ऋचा ६ व ७)

आत्मतत्वापासून विश्व कसे निर्माण झाले हा या प्रकरणातील मुख्य विषय आहे. यामध्ये प्रामुख्याने विश्वनिर्मितीच्या पूर्वीची आत्मतत्वाची स्थिती कशी होती तसेच अशा 'एकमेव' आत्मतत्वापासून विश्व निर्माण होण्याआधी ते कसे प्रकट झाले हे पहावयाचे आहे. आत्मतत्वाच्या प्रकटीकरणानंतर विश्वनिर्मितीची प्रक्रिया कशी सुरु झाली व हे आत्मतत्वच विश्वरूपाने कसे नटले आहे याचे वर्णन नासदीयसूक्तावर श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या भावार्थावरील विवरणातून पहावयाचे आहे.

## विश्वनिर्मितीपूर्व स्थिती

**श्रीदासराममहाराजांच्या भावार्थाचा सारांश (ऋचा १ व २) :**

ऋचा १ व २ मध्ये सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वीच्या स्थितीचे वर्णन आले आहे. सृज् म्हणजे निर्माण करणे. यापासून सृष्टी हा शब्द बनला आहे. तेंव्हा सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी सत् नव्हते, असत्ही नव्हते. त्याठिकाणी पंचमहाभूतात्मक सृष्टी नव्हती. तेव्हा मृत्यू नव्हता व अमृत (अमरत्व) नव्हते. शून्यभूत जीवनाची गाढ अवस्था म्हणजे मृत्यू व जीवित्वही नव्हते. दिवस व रात्र ही नव्हते.

मग त्या ठिकाणी काय होते ते दुसऱ्या ऋचेमध्ये आले आहे. दिक्, काल व आकाश यांच्या अतीत केवळ आत्मावस्थाच होती. देहधारणेमुळे दिवस व रात्र यांचे ज्ञान होते. त्या आत्मत्वाच्या ठिकाणी, ही देहावस्थाच नाही. अशा त्या ठिकाणी ते 'एकमेव' आत्मतत्व आपल्या स्वसामर्थ्याने वा स्वेच्छेने स्फुरत होते. ते वायुशिवाय श्वासोच्छ्वास करीत होते. त्याठिकाणी आत्मलहरीचे अतिसूक्ष्म असे स्पंदन निरतिशय, निरामय स्थितीत होते. या व्यतिरिक्त त्या ठिकाणी निराळे दुसरे असे काहीही नव्हते.





**विवरण :**

हे सर्व जगत् ज्या 'तत् एकम्' ने व्यापून टाकले आहे त्याचे स्वरुप, सृष्टी निर्माण होण्याच्या अगोदर कसे होते याचे येथे मुख्यत: विवरण आहे. पहिल्या ऋचेमध्ये संपूर्ण चेतन व अचेतन सृष्टीला व्यापून असणारे सत् व असत् या द्वंद्वाचा उल्लेख आहे. ही सर्व सृष्टी द्वंद्वमय स्वरुपाची आहे. अशा या द्वंद्वमय सृष्टीचे 'पहिले' द्वंद्व म्हणजे सत्-असत् होय. सत्-असत्चे दोन अर्थ होतात. एक अर्थ म्हणजे असणे-नसणे व दुसरा अर्थ म्हणजे सत्य-असत्य. एखाद्या 'अस्तित्वात' असलेल्या गोष्टीचे जेंव्हा आपण वर्णन करतो, त्याची व्याख्या करतो तेंव्हा तेवढ्या अंशाने ती गोष्ट मर्यादित होते. असे करणे म्हणजे त्याला मर्यादित करणे होय. परंतू ती मूळ 'वस्तू' तर अमर्याद, अनंत आहे. शब्दाने ती सांगता येत नाही. म्हणून ती नि:शब्द आहे. बरे त्या वस्तूस 'असत्' म्हणावे तर ''ते एक स्वसामर्थ्याने स्फुरत होते', असे म्हटले आहे. त्यामुळे त्याला असत् ही म्हणता येत नाही. सत् - असत् हे द्वंद्व आहे. मूळ निर्द्वंद्व वस्तू सत्ही नाही. असत् ही नाही. ती सत्असत्च्या पलिकडे निर्नाम आहे.

मृत्यू-अमृत, रात्र-दिवस ही चेतन जगतातील द्वंद्वे आहेत, तर सत्-असत् हे सचेतन व अचेतन अशा दोन्ही सृष्टीला व्यापून असतात.त्यामुळे जेथे सत्-असत् ह्या द्वंद्वाचा निषेध सिध्द होतो तेव्हा त्यांच्या अंतर्गत येणारी केवळ चेतन सृष्टीला व्यापून असणाऱ्या मृत्यू-अमृत व रात्र-दिवस या द्वंद्वाचा निषेध आपोआपच सिध्द होतो. दुसरे असे की चेतन जगतातील सर्व गोष्टी उत्पत्ति-लयाच्या नियमाप्रमाणे चालू असतात. परंतु त्याठिकाणी उत्पन्न होऊन विलय पावणारा नाशवंत जगताचा पसाराच नव्हता, तर मग मृत्यू तर कोठून असणार ? तेथे मृत्यू नव्हता म्हणून अविनाशी अमृतपण नव्हते. रात्र व दिवस यांचे ज्ञान आपल्याला चंद्र-सूर्य यांच्याद्वारे होते, जगतच नाही म्हणजे तेंव्हा चंद्र-सूर्य

यांचे अस्तित्वही नाही. अर्थातच त्यामुळे दिवस व रात्र यामुळे उद्‌भवणारा 'काळ' ही नव्हता. थोडक्यात म्हणजे, जगत् उत्पत्तीपूर्वी प्रकृति-पुरुष हे द्वंद्व नव्हते. सत्व-तम-रज हे त्रिगुण नव्हते. पंचमहाभूते नव्हती. भोक्ता-भोज्य-भोग अशी त्रिपुटि नव्हती. दिक्-काल नव्हते. अशा प्रकारची शब्दयोजना व वर्णन हे द्वंद्वसृष्टीपलीकडील वस्तूचे निर्द्वंद्वरूप दर्शविण्यासाठी करावी लागते. त्यावेळी जगताचा आरंभच झाला नव्हता. म्हणून ती 'अजगत्' स्थिती होय. जगत् नव्हे ते अजगत्, जगत् म्हणजे गतिमान वस्तू. असे हे जगत् द्वंद्वमय आहे. कारण द्वंद्व हे गतीतच राहते. द्वंद्व असलेने सापेक्षता येते. म्हणून हे जगत् सापेक्ष आहे. सापेक्षता हा गतीचा धर्म आहे. त्यामुळे त्या अजगत् स्थितीचे वर्णन केवळ जगताचे स्वरुपावरूनच लक्षात घ्यावे लागते.

असे हे असण्यानसण्याच्या पलीकडे असलेले आत्मतत्व वायुशिवाय स्वसामर्थ्याने श्वासोच्छ्‌वास करीत होते, स्फुरत होते. श्वासोच्छ्‌वास ही अस्तित्वाची खूण आहे. आपण देखील माणसाचे अस्तित्व त्याच्या प्राणधारणेवरून ओळखतो. प्राणाची धारणा श्वासोच्छ्‌वासामुळे लक्षात येते. माणसाला आपल्या जिवंतपणाची म्हणजे आपल्या अस्तित्वाची जाणीव श्वासोच्छ्‌वासावरूनच होते. मी आहे कारण मी श्वसन करतो. हा आपल्या सर्वांचा अनुभव आहे. आपल्या अस्तित्वाला कारणीभूत 'श्वासोच्छ्‌वासाचे' लक्षण निर्द्वंद्व आत्मरूपालाही लागू आहे. श्वासोच्छ्‌वासाचे/स्फुरणाचे हे लक्षण आत्मरूपातही दिसून येते. दोन्हीमध्ये फरक असा की, मनुष्य आत्मबलाने श्वासोच्छ्‌वास करतो, तर आत्मरूप स्वबळाने श्वासोच्छ्‌वास करते. मनुष्य वायूच्या सहाय्याने तर आत्मरूप वायूवाचून स्फुरत असते, श्वासोच्छ्‌वास करीत असते. त्यावेळी जगतच नव्हते. त्यामुळे द्वंद्वातील कोणतीच कोटी तेथे असणार नाही. आत्मतत्वाला त्यांच्या अपेक्षेने सांगता





येणारी अशी कोणतीच प्रतिकोटी नाही म्हणून त्याला निर्द्वंद्व एकमेवाद्वितीय म्हणावयाचे.

अशा या आत्मतत्वालाच 'ब्रह्म' म्हणतात. म्हणूनच 'अयं आत्मा ब्रह्म' असे म्हटले आहे. आत्मतत्व स्वसंबंध, स्वयंप्रकाशी, नि:शब्द, निश्चळ, निर्गुण, स्वयंसिध्द, चैतन्यरूप असे अंतिम सत्य आहे. असे हे अंतिम परतत्व हे एकमेवाद्वितीय असून तेच सर्व स्थूल व सूक्ष्म जग व्यापून राहिले आहे. त्याच्यापासून हे जग उत्पन्न होते व त्याच्यामुळेच जिवंत राहते व शेवटी त्याच्यातच लीन होते हाच सर्व उपनिषदांचाही तात्विक चर्चेचा मुख्य विषय आहे.

## जगताचे/आत्मतत्वाचे प्रकटीकरण

**श्रीदासराममहाराजांच्या भावार्थाचा सारांश (ऋचा ३) :**

प्रथमत: ते 'एकलेच' स्फुरण पावत होते. ते स्फुरण म्हणजेच चैतन्य वा वायुतत्व होय. ते जाणीव-नेणीवरहित असे चैतन्यतत्व होते. तेथे मनाचे कार्य नव्हते. ते अंध:काराने झाकलेले होते. दृष्टीचे कामच नव्हते म्हणून अंध:कार होता. त्या वायूतत्वाला आकाशाचे आवरण होते. त्यात प्राण खेळत होता. आकाश व प्राण यांच्या संघर्षाने प्रकाश निर्माण झाला. त्यामुळे ते गुह्य असे आत्मतत्व प्रकट झाले.

**विवरण :**

मूळ निर्द्वंद्व आत्मतत्व अजगत् स्थितीत होते. ते बैठ्या स्थितीत होते. जगतनिर्मिती होण्याआधी ते आत्मतत्व तमाच्या आत बुडून गेले होते. ते गूढ सलिल (पाणी) म्हणजेच ब्रह्मांडरूपी जगत् (आभु) हे अंध:काराच्या पोटात

झाकलेले होते. येथे अंधाराला तुच्छ म्हटले आहे. ते आत्मतत्व स्वेच्छेने तपाच्या सहाय्याने प्रकट झाले. तपाच्या सामर्थ्याने तमासारखे तुच्छ मागे पडले व गतिमान जगताच्या निर्मितीला सुरुवात झाली. नवीन सृष्टी निर्माण करण्याची क्षमता तपामध्ये आहे. अंधार दूर करून प्रकाशित होणे हे तपाचे कार्य आहे. तमाच्या पोटामध्ये तेजाचे गर्भबीज होते. असे हे तम विरुध्द तेजाचे द्वंद्व हे प्रकटीकरणाच्या सुरुवातीला उत्पन्न झाले. या प्रथम द्वंद्वापासूनच पुढे जगतामधील सर्व द्वंद्वातील कोटी निर्माण झाल्या. अशातऱ्हेने तपामुळे निर्माण झालेल्या तेजाने जगताच्या प्रकटीकरणाला सुरुवात झाली.

श्रीदासराममहाराज सांगतात की प्रथम त्याठिकाणी प्रथम केवळ ते 'एकलेच एक' स्वेच्छेने स्फुरण पावत होते. ते स्फुरण चैतन्यमय स्वरुपाचे आहे. ज्या ठिकाणी स्फुरण आहे त्या ठिकाणी सूक्ष्मतर, सूक्ष्मतम अशा चिद्वायूच्या लहरी असतात. म्हणून चैतन्य हे वायुरूप आहे असे म्हटले आहे. स्फुरणामध्ये वायू आहे. स्फुरणामध्ये गति आहे. गतीचा परिणाम म्हणजे हे जगत् आहे. म्हणून जगत् हे सुध्दा गतिमान आहे. जगतातील सर्व गोष्टी गतिमान आहेत. सर्व गोष्टी सतत बदलत असतात. त्या बदलामध्ये सातत्य असल्याने हे भोवतालचे दृश्य आपल्याला अखंड वाटते. गतीमुळे - परिभ्रमणामुळे जग खरे वाटते. ज्या तपामुळे जगत् निर्माण झाले ते 'तप' गतीचा परिणाम आहे. गति नाही तर तप नाही. त्या आत्मरुपाची पहिली गति म्हणजे त्याच्या ठिकाणी होणारा मनाचा उद्भव होय. असे हे 'गति' हे अध्यात्म व विज्ञानाचे दृष्टीने मूलभूत तत्व आहे.

आता आकाश व प्राण यांच्या संघर्षातून ते गुह्य असे आत्मतत्व कसे प्रकट झाले आणि त्यातूनच विश्वनिर्मितीला कशी सुरुवात झाली हे पाहू. आपण पाहिले की जे 'एकले' आत्मतत्व स्फुरण पावत होते ते प्राणतत्वाचे





स्फुरण होते. म्हणजेच चैतन्याचे स्फुरण होते. प्राण म्हणजे उत्स्फूर्त झालेले चैतन्यरूप गतितत्व होय. चैतन्य वाहू लागले की त्यालाच 'प्राण' म्हणतात. हा प्राण म्हणजे चैतन्याचा उत्सर्जच होय. हे प्राणतत्वच मूळ स्फुरणद्रव्य होय. म्हणूनच 'ब्रह्मेति प्राण: ।' अशी श्रुति आहे. स्फुरणाद्वारे स्पंदने घडू लागतात. ही स्पंदने लहरीसारख्या अवस्थेत असतात. स्फुरणद्रव्य प्राणच असल्याने ही प्राणाची लहर होय. या प्राणलहरी स्पंदरुपाने असतात. प्राणाचे स्पंदन म्हणजे आकाश होय. स्पंदन/स्फुरण घडण्याला अवकाश हवा. वायुतत्वाला/चैतन्यतत्वाला/प्राणतत्वाला अशा तऱ्हेने आकाशाचे आवरण घातले जाते.

ज्या स्वेच्छेने ते 'एकले' स्फुरण पावत होते, त्याच स्वेच्छाभावाने त्याने विश्वनिर्मितीला प्रारंभ केला. आकाशावर प्राणाचे कार्य सुरु झाले. हा आकाश आणि प्राण यांचा संघर्ष म्हणजेच 'तप' होय. या संघर्षाचा परिणाम म्हणून एका बाजूने आकाश प्रकटले व दुसऱ्या बाजूने तेजाचे प्रकटीकरण झाले. आकाश प्रकाश दर्शवितो. आकाशात व्यापकता आहे. आकाशामुळे अव्यक्ताला व्यक्तता आली. प्रकाशामुळे गुह्य असे आत्मतत्व प्रकट झाले. दुसऱ्या बाजूने तेजाचे कार्य सुरु झाले. प्रकाशाच्या ठिकाणी तेज आहे. तेज उष्णता दर्शविते. तेजामुळे एकाला अनेकत्व प्राप्त होऊन विश्वनिर्मितीला प्रारंभ झाला.

आकाशावर अशा तऱ्हेने प्राण कार्य करतो व तपामुळे विश्वाच्या उत्पत्तीस प्रारंभ होतो. हा प्राणच गतीच्या रुपाने व्यक्त होतो व सर्व विश्वात खेळत राहतो. पुढे ही प्राणगतीच विश्वातील नाना शक्तीच्या रुपात विकसित होत जाते. मानवी देहातसुध्दा हीच प्राणगति असते.

## विश्वनिर्मितीची प्रक्रिया

**श्रीदासराममहाराजांच्या भावार्थाचा सारांश (ऋचा ४) :**

वायूचा आणि मनाचा निकटचा संबंध आहे. संकल्प हेच मनाचे रेत (बीज) असून त्यामुळेच या चिद्‌वायूरुपात इच्छा निर्माण झाली. हे अखिल विश्व म्हणजे या वायूचा, या वाऱ्याचा एक सहज संकल्प आहे. हा चैतन्याचा वारा आहे. हे जे मूळ आत्मतत्व/चिद्‌तत्व आहे तेथेच 'एकोऽहं – बहुस्याम' – अशी स्फूर्ति झाली आणि त्यामुळेच हे विश्व साकार झाले. हा काम (इच्छा) उद्‌भवला, तोच सत्‌ आणि असत्‌ यांच्यामधला संबंध होय. या कामामुळे विश्व आकारास आले.

हीच सृष्टीनिर्मितीची प्रक्रिया श्रीदासराममहाराजांनीअशीही सांगितली आहे – चिद्‌वायुरूपाची केवळ दृष्टी एका बिंदूवर निर्हेतुकपणे पडली. ही दृष्टी ज्या बिंदूवर पडली तेथे लहरी निर्माण झाल्या. त्या लहरीमधूनच शून्य, शून्यातून प्रस्फुटगगन व पुढे आकाश यांची निर्मिती झाली. त्यानंतर ही भूतसृष्टी उत्पन्न झाली. अशातऱ्हेने चैतन्य प्रकाशमान झाले. अशातऱ्हेने विश्वनिर्मितीची प्रक्रिया श्रीदासराममहाराजांनी या ऋचेमध्ये आलेल्या भावार्थामधून सांगितली आहे.

मागील ऋचेमध्ये 'सत्‌तत्व' प्रकट होऊन त्याला कशी व्यक्तता आली ते पाहिले. या ऋचेमध्ये विश्वनिर्मितीची प्रक्रिया सांगितली आहे. तपाच्या महिम्यामुळे ते अव्यक्त सत्‌ ब्रह्म प्रकटले असे म्हटले आहे. परंतु असे तप त्याने का केले असा प्रश्न उत्पन्न होतो. याचे उत्तर म्हणजे असे तप करावे अशी त्याला कामना निर्माण झाली. 'एकोऽहं बहुस्याम्‌ प्रजायेय–' एक असलेले आपण बहु व्हावे अशी त्याला इच्छा झाली. परंतु बहू व्हावे अशी कामना निर्माण होण्याआधी 'एकोऽहं –' म्हणजे आपण 'एकले एक' आहोत





असे सुरुवातीला त्यास कसे कळले ? – याचे उत्तर म्हणजे ती वस्तू – तो परमपुरुष अगर ते परब्रह्म ज्ञानमय आहे, हे होय. (ज्ञानोमयोयं पुरुषः). तो स्वयंभू ज्ञानमय असल्यामुळे त्याला सहजच आपल्या ठिकाणी आपल्या एकटेपणाचा साक्षात्कार झाला. त्याला 'मी' पणाची स्फूर्ति झाली. त्या 'एकोऽहं' – 'मी एकला आहे' – या जाणीवेबरोबरच मनाची उत्पत्ति झाली. त्या 'मी' पणाला वा त्या पहिल्या अहंकाराला 'आत्मा' हे नाव प्राप्त झाले. 'असा जो पहिला अहंकार परमेश्वराच्या ठायी स्फुरण पावला, त्यामुळेच तो 'आत्मा' झाला. मूळारंभी स्फुरण पावलेल्या 'मी'पणामुळेच त्याने 'आत्मन्‌' हे नाम धारण केले. अशा तऱ्हेने ते 'ब्रह्मन्‌', तो परमेश्वर, मन धारण करून 'आत्मवान' झाला. तो 'स्वसंवेद्य' झाला. त्याला स्वतःला स्वतःच्या असण्याची जाणीव झाली. हा विषय मानवाच्या संदर्भानेही पाहता येतो. मानवाला ईश्वराची लहान प्रतिकृती मानले जाते. म्हणूनच 'आत्मा' हा शब्द मनुष्याच्या 'मी'पणाला उद्‌देशून संबोधला जातो. मनुष्यही मन धारण करूनच आत्मवान झाला आहे. मनाच्या विशुध्द अवस्थेतच माणसाला केवळ 'मी आहे' अशी जाणीव असते याचा अनुभव घेतला जाऊ शकतो.

कोणतेही कार्य घडण्यासाठी प्रथम ते कार्य व्हावे अशी इच्छा, तशी कामना व्हावी लागते. इच्छा करणे हा मनाचा धर्म आहे. परंतु इच्छा करण्यासाठी आधी मन असावे लागते. म्हणून मन नसलेल्या सत्‌वस्तूने मन धारण केले व मनामध्ये जगाची कल्पना केली. जगत्‌ निर्माण व्हावे अशी इच्छा केली. ईश्वराकडून जगत्‌ साकारण्याची कल्पना सहजपणे घडली. कल्पनेने विश्व निर्मिती झाली. परमात्म्याने कल्पनेने स्वप्न पाहिले व ते मनःस्वप्न सहजच साकार झाले. कारण ईश्वराच्या ठिकाणी असलेल्या मनाच्या ठायी मनःस्वप्न साकार करण्याचा सहजधर्म आहे. कल्पनेने स्वप्न साकारताना स्वप्नातील साकार होणाऱ्या जगतामध्ये सारे कांही तोच होतो. असे हे विश्व

काल्पनिक असल्यामुळे व कल्पना टिकणारी नसल्याने हे दृश्य टिकू शकत नाही. जोपर्यंत स्वप्न चालू असते तोपर्यंत स्वप्नातील सर्व गोष्टी खऱ्याच वाटतात. परंतु स्वप्नातून जागे होताच स्वप्नातील जग, दृश्य, आपोआपच नाहीसे होते. सारांशाने असे म्हणता येईल की प्रथम त्या सत्वस्तूला स्वत:च्या असण्याची जाणीव होती कारण तो स्वयंभू ज्ञानमय आहे. त्यानंतर त्याला स्वत:च्या एकत्वाचा साक्षात्कार झाला. त्याचवेळी त्याचे ठिकाणी मनाची धारणा झाली. त्यानंतर त्या मनामध्ये बहु होण्याची इच्छा झाली व ही इच्छा/संकल्प/मन:स्वप्न सहजपणे साकार झाले. अशा तऱ्हेने विश्वाची निर्मिती झाली.

याच ऋचेमध्ये काम /इच्छा हाच सत् व असत् चा संबंध आहे असे म्हटले आहे. येथे मूळ ब्रह्माला, मूळ वस्तूला असत् असे म्हटले आहे. याचा अर्थ मूळ वस्तू 'काही नाही' या अर्थाने घेता येत नाही. कारण अभावदर्शक अशा काहीच नसण्यातून कोणतेच 'असणे' उद्‌भवू शकत नाही आणि दुसरे म्हणजे याच सूक्ताच्या दुसऱ्या ऋचेमध्ये 'ते एकलेच एक वायुशिवाय स्फुरत होते' असे स्पष्टपणे म्हटले आहे. त्यामुळे येथे असत् हे 'कांहीच नसणे' या अर्थाने न घेता 'अव्यक्त' या अर्थाने आलेले आहे. म्हणून या ठिकाणी असत् म्हणजे अव्यक्त व सत् म्हणजे व्यक्त यांना जोडणारा दुवा, जोडणारा धागा म्हणजे काम-इच्छा होय. म्हणून या काम-इच्छा यांना 'कामरश्मि' असे म्हटले जाते. हाच व्यक्त-अव्यक्ताला जोडणारा कामरुपाचा धागा (कामरश्मि) जगतात सर्वत्र पसरलेला दिसून येतो.

श्रीदासराममहाराज विश्वनिर्मितीची ही प्रक्रिया दुसऱ्या पध्दतीने सांगतात, - सच्चिदानंद परमात्मा वायुस्वरूप आहे. सत्-चिद्-आनंद या मधील 'चिद्' मुळेच हे विश्व उत्पन्न होते. केवळ 'सत्' रुपात असणारा





परमात्मा हा 'चिद्' शिवाय प्रकट होऊ शकत नाही. म्हणून सद्-चिद् अशी जोडी आहे. अर्थात जेथे सद् व चिद् आहे तेथे आनंद हा असतोच. त्यामुळे चिद् अर्थात चैतन्याला अत्यंत महत्व आहे. चिद् (चैतन्य) म्हणजे ज्ञान, जाणीव व स्वसंवेद्यता. जेथे 'चिद्' आहे तेथे दृष्टि आहे. त्या मूळ आत्मवस्तूचे पहाणे किंवा न पहाणे हे सहजपणे होत असते. तो जेंव्हा डोळे मिटून ध्यानस्थ होतो तेंव्हा महाप्रलय होतो. तेंव्हा सर्व सर्व विश्व नाहीसे होते. त्या मूळ वस्तूचे न देखणे म्हणजे त्याची स्वरुपनिद्रा होय. याउलट अशा आत्मतत्वाचे देखणे म्हणजे या विश्वाचे प्रकट होणे होय. तो डोळे उघडतो तेंव्हा हे विश्व आविर्भूत होते. त्याचे देखणे वा न देखणे हे स्ययंस्फूर्तपणाने घडत राहते. जेंव्हा त्याचे पाहणे घडते तेंव्हा त्याची दृष्टि एका बिंदूवर पडते. त्या बिंदूला 'शून्य' असे म्हणतात. त्या ठिकाणी लहरी निर्माण होतात. ज्या ठिकाणी लहरी असतात तेथे 'गति' हे तत्व असते. हे 'गतितत्व' विश्वनिर्मितीच्या प्रक्रियेमध्ये आणि विश्वाच्या धारणेमध्ये प्रमुख सूत्र आहे. ज्या शून्यामध्ये लहरी निर्माण होतात त्या शून्याला 'आकाश' म्हणतात. या ठिकाणी गगनाचा गाभा म्हणजे संपूर्ण 'चिदाकाश' प्रकट झाले. या चिदाकाशातून प्रथम प्रस्फुट गगन (अशब्द स्थिती) निर्माण झाले. त्यातून पुढे भूताकाश - आणि त्यानंतर वायु - तेज - पाणी अशी पंचमहाभूते व त्रिगुणात्मक अशा सृष्टीची उत्पत्ति झाली.

## विश्वाचे स्वरुप

**श्रीदासराममहाराजांच्या भावार्थाचा सारांश (ऋचा ५) :**

वायुप्रकाशरूप आत्मतत्व हे संपूर्ण विश्वामध्ये भरून राहिले आहे. ती अमोघ शक्ती वर-खाली, अंतर्बाह्य विश्वाला व्यापून उरलेली आहे. हे आत्मतत्व माळेतील दोऱ्याप्रमाणे दृश्याच्या आड लपून राहिले आहे. संकल्प

धारण करून विश्वाचे प्रकटणे अगर कल्पनातीत होऊन त्या दृश्यविश्वाचा निरास करणे हे आत्मतत्वाचे अंगभूत सामर्थ्य आहे. जगतामध्ये जेथे ते आत्मचैतन्य शून्यभूत होते तेथे जडत्वाची व तेच प्रकर्षाने चाळवले की केवळ चैतन्याची जाणीव जीवाला होते. जीवाच्या दृष्टीने ते आत्मशक्ती प्रकट झाली की दृश्याचा निरास होतो व ती लपून राहिली की दृश्याचा पसारा दृष्टीसमोर थैमान घालू लागतो.

**विवरण :**

दासराममहाराज या सूक्तातील पाचव्या ऋचेच्या भावार्थातून चैतन्यरूप विश्वाचे स्वरुप प्रकट करतात. हे चैतन्य वायुरूप आहे. तसेच ते नादप्रकाशयुक्त आहे. असे हे चैतन्य सर्वत्र पसरले आहे. या विश्वात चैतन्य व्यापले नाही अशी कोठेही किंचित जागा मोकळी नाही. विश्व हे जड व चेतन अशा दोन पदार्थांनी बनले आहे. चैतन्य हे दोन्हींमध्ये समान रुपाने व्यवहार करते. विश्वातील सर्व चेतन-अचेतन पदार्थ तसेच या विश्वात घडणाऱ्या सर्व घटना यामध्ये हेच चैतन्याचे सूत्र कायम असते. त्याच्याच अधिष्ठानावर विश्वातील सर्व पदार्थांचे अस्तित्व व घटना घडत असतात. आपण पहातो की विश्वातील घडणाऱ्या सर्व घटनांमध्ये कांही ठराविक क्रम आढळतो, तसेच त्यामध्ये नियमितपणा व सुरळीतपणा दिसून येतो. हे असे सर्व जगतातील व्यवहार सुरळीतपणे घडण्याचे कारण म्हणजे या सर्वापाठीमागे असलेले चैतन्याचे सूत्र होय.

दासराममहाराजांनी त्या चिद्तत्वाला मण्याच्या माळेतील दोऱ्याची उपमा दिली आहे. चैतन्य म्हणजे स्पंद होय. हा स्पंदाचा दोरा अनंत विश्वाच्या मध्यातून ओवलेला आहे. दोरा घेऊन त्यात मणी गुंफतात त्याप्रमाणे सर्व जीव, सर्व पदार्थ एकाच सूत्रात गोवलेले आहेत. हे सूत्र म्हणजे चैतन्य आहे. सर्वांच्या





अंतर्यामी एकच एक चैतन्य आहे. सारी सृष्टी द्वंद्वमय आहे. दोन कोटीद्वारे एक द्वंद्व बनते. उदाहरणार्थ रात्र व दिवस, जड व हलके, थंड व उष्ण अशा कोटीपासून बनलेल्या द्वंद्वामुळे हे सर्व जगत् आहे. यातील प्रत्येक कोटीमध्ये चैतन्य सारखेच पसरले आहे. त्यामुळेच हे जग म्हणजे चैतन्यरूप परमेश्वराचे साकार रूप आहे असे म्हटले जाते. 'हरि एव जगत् । जगत् एव हरि ।'

मागील चौथ्या ऋचेमध्ये त्या 'निर्विकल्प एकम्' ने सृष्टिनिर्मितीची कल्पना मनामध्ये धारण केली आणि ती सहजपणे साकार झाली असे म्हटले आहे. याचाच अर्थ स्वेच्छेने कल्पना करण्याने विश्व साकारते व तेच आत्मतत्व जेंव्हा स्वेच्छेने निर्विकल्प अवस्था धारण करते, तेंव्हा दृश्य विश्वाचा निरास होतो, म्हणजेच कल्पना करणे अगर कल्पना न करणे यावर विश्वाचे प्रकट होणे वा त्याचा लय अवलंबून आहे. ही सृष्टी त्या आत्मतत्वाच्या ठिकाणी सहजतेने प्रकटते व लय पावते. म्हणूनच ही सृष्टी त्या चिद्वायूच्या अंगभूत आहे असे म्हटले जाते.

जीवाला मात्र सर्वत्र पसरलेल्या चैतन्याचा निरनिराळ्या प्रकारे अनुभव येतो. मनुष्यामध्ये हे चैतन्य विशेषत्वाने जाणवते. परंतु दगड-धोंड्याच्या ठिकाणी ते स्पष्टपणे जाणवत नाही. दगड-माती-पाणी-वनस्पती-प्राणी आणि मानव यामध्ये चढत्या क्रमाने चैतन्याचा आविष्कार होताना दिसतो. दगड-धोंड्यामध्ये जेथे चैतन्य स्पष्टपणे प्रकट झालेले नसते तेथे चैतन्य शून्यभूत होते, तेंव्हा त्याला 'चेतन'च्या अपेक्षेने 'जड' म्हटले जाते व जीवाला त्याचा जडरुपाने अनुभव येतो. याउलट माणसामध्ये जेथे चैतन्याचा प्रकर्ष झालेला असतो तेथे केवळ चेतनत्वाचा, जिवंतपणाचा अनुभव येतो. जीव जेंव्हा कल्पनेचा निरास करून निर्विकल्प अवस्था प्राप्त करून घेतो तेंव्हा त्याला सर्वत्र चैतन्य प्रकट झाल्याचा अनुभव येतो. जडाची उपाधी दूर होते व

दगड-धोंडे वगैरे अचेतन-जड वस्तूमध्येसुध्दा चैतन्य प्रकट झाल्याचा अनुभव येतो. याउलट जीव जेंव्हा कल्पनेवर येतो तेंव्हा देहभावावर आलेल्या जीवाच्या ठिकाणी चैतन्य लपून राहते आणि विश्वातील चेतन - अचेतनानी भरलेल्या दृश्याचा पसारा त्याच्यासमोर प्रकट होतो.

## विश्वनिर्मितीचे रहस्य

**श्रीदासराममहाराजांच्या भावार्थाचा सारांश (ऋचा ६ व ७) :**

या सृष्टीनिर्मितीचे नेमके रहस्य कोण पूर्णपणे जाणू शकतो याचा विचार येथे मांडला आहे. देवाला सर्व कांही ज्ञान असते असे आपण समजतो. परंतु देवसुध्दा सृष्टीच्या नंतरचे आहेत. त्यामुळे देवही हे सृष्टीनिर्मितीचे रहस्य जाणण्यास असमर्थ आहेत. तसेच जो परमआकाशात राहणारा अधिष्ठानरूप अध्यक्ष (हिरण्यगर्भ) तोही हे रहस्य जाणत असेल किंवा नसेल याबद्दल शंका आहे.

**विवरण :**

ही वैचित्र्यपूर्ण सृष्टी कशी व कोठून आली याचा विचार ऋचा एक ते पाच मध्ये पाहिला. ती जी अंतिम आत्मचैतन्य सत्ता, तेथूनच ही सृष्टी निर्माण झाली. ही सृष्टी म्हणजे त्या आत्मसत्तेचाच विलास आहे. ते चैतन्य विश्वातील प्रत्येक अणू-रेणूमध्ये भरून राहिले आहे. या विश्वामध्ये जे कांही अस्तित्वात आहे आणि जे कांही अस्तित्वात नाही, अशी जी आहे-नाहीची सापेक्षता त्या निरपेक्ष अंतिम सत्तेमुळेच आपल्याला अनुभवता येते असे त्याचे सार मांडता येईल.

ही अद्‌भूत सृष्टि कोणापासून आणि कशापासून निर्माण झाली हे निश्चितपणाने कोणाला सांगता येईल असा विचार मनात येतो. या प्रश्नाचे उत्तर





शोधताना आपल्याला असे लक्षात येते की देहबुध्दीतील मानवामध्ये तरी हे रहस्य जाणणारा कोणीही दिसत नाही. मानवबुध्दीच काय परंतु देवबुध्दीसुध्दा मूळ 'सत्' ची उत्पति जाणू शकत नाही. खरे म्हणजे देव हे माणसापेक्षा श्रेष्ठ तसेच सर्वज्ञ आहेत. परंतु माणसाप्रमाणे देवही सृष्टीच्या नंतरच, या सृष्टीमध्ये मागून जन्मास आले आहेत. मानव व देव दोघेही या सृष्टीचेच घटक आहेत. त्यामुळे मानव व देव हे दोन्हीही सृष्टीनिर्मितीचे रहस्य जाणू शकत नाहीत.

देवापेक्षा हिरण्यगर्भ हा पुरातन आणि श्रेष्ठ मानला जातो. हिरण्यगर्भ हा जगताचा व्यक्त प्रतिनिधी मानला जातो. तो या सृष्टीच्या परमव्योमाचे ठिकाणी राहणारा अध्यक्ष होय. तो तरी यथार्थाने हे रहस्य जाणत असेल अथवा नसेल अशी शंका व्यक्त केली आहे. यासाठी दासराममहाराजांनी दोन उदाहरणे दिलेली आहेत. ज्याप्रमाणे सूर्य आहे म्हणून सृष्टीत अनंत जीव जगले जातात. परंतु आपल्यामुळे हे जीव जगले जातात याची सूर्याला कल्पना नसते. दुसरे उदाहरण म्हणजे झोपेमध्ये आपण स्वप्न निर्माण करतो व पाहतो. परंतु आपल्याला त्याची कल्पना नसते. याचप्रमाणे हिरण्यगर्भ, ज्याने सृष्टी निर्माण केली असे मानले जाते,तो सुध्दा हे रहस्य जाणत असण्याची शक्यता नाही.

असे असेल तर मग हे विश्वनिर्मितीचे रहस्य जाणतो तरी कोण ? दासराममहाराजांनी याचे अत्यंत मार्मिक उत्तर दिले आहे. दासराममहाराज म्हणतात, की परमात्म्याने ठरविले तर तोच नादरुपाने हे रहस्य सांगेल. पण यासाठी त्या परमात्म्याच्या कृपेची आवश्यकता आहे. त्यांच्या कृपेला पात्र होण्यासाठी जे कांही करावयाचे त्याला 'साधन' म्हणतात. परमात्म्याची कृपा होताच तोच नादरुपाने हे सांगेल. कारण नादरुपाने आत्माच प्रकट होत असतो. दुसरे म्हणजे आत्मरुप झालेले संत-महात्मे आत्मप्रचितीने हे जाणू शकतात. कारण नादरुपाने आत्माच त्यांचे ठिकाणी प्रकट झालेला असतो. अशा प्रकारे संत-महात्म्यांचे श्रेष्ठत्व दासराममहाराजांनी सिध्द केले आहे.

# नासदीय सूक्त - विवरण

(श्रीदासराममहाराजकृत भावार्थावरील विवरण)

## प्रकरण क्र. ४

## नासदीय सूक्त : भावार्थावरील विवरण (भाग २)


१) जीवाच्या अवस्था (ऋचा १ व ६)

२) साधन साक्षात्कार (ऋचा १)

३) भावार्थाची वैशिष्ट्ये

मागील प्रकरणामध्ये हे विश्व का व कसे निर्माण झाले यासंबंधी नासदीयसूक्तामधील सूक्तांचा दासराममहाराजांनी केलेल्या भावार्थसंबंधाने उहापोह केला. या प्रकरणामध्ये श्रीदासराममहाराजांनी जीवाचा व जगताचा तसेच जीवाचा व आत्मतत्वाचा संबंधाने केलेला भावार्थ पहावयाचा आहे. हे करताना जीवाच्या विविध अवस्था, बदलणाऱ्या अवस्थांमुळे बदलणारे ज्ञान तसेच जीवनाचे सर्वोच्च ध्येय जे आत्मसाक्षात्कार आणि त्यासाठी करावयाचे साधन यांचाही विचार करावयाचा आहे.

## १) जीवाच्या अवस्था

**श्रीदासराममहाराजांच्या भावार्थाचा सारांश (ऋचा १ व ६)**

ही सृष्टी त्या चैतन्याच्या अंगभूत आहे. विश्वरुपाने साकार होणे हा त्याचा सहजस्वभाव आहे. त्या निर्विकल्प मूलभूत आत्मस्थितीच्या ठिकाणी सूक्ष्मतम स्वरुपाच्या लहरी असतात. त्या लहरींचा परिणाम म्हणून विश्वाची ही रचना आहे. माणूस हा विश्वाचाच घटक आहे. हा माणूस सतत कोणत्या ना कोणत्या अवस्थेत स्थित असतो. प्रत्येक जीव जागृति, स्वप्न व सुषुप्ति या अवस्था भोगत असतो. जागृति असेल तर दृश्य वस्तूचे भान, स्वप्न असेल तर अदृश्य पदार्थाचे भान तर सुषुप्तीत तर कशाचेच भान असत नाही. याचा अर्थ जशी अवस्था तसे भान व जसे भान तसे ज्ञान होत असते.

ज्याप्रमाणे जीवमात्राच्या ठिकाणी अवस्था असतात त्याचप्रमाणे दृश्यविश्वातील पदार्थ ही वायुरूप, द्रवरूप व घनरूप अशा अवस्थेत असतात. या पदार्थांमध्ये स्थित्यंतर, अवस्थांतर व रुपांतर घडत असते. जशी जीवाची अवस्था तसे दृश्यामधील पदार्थांच्या अवस्थेचे भान व ज्ञान जीवाला होत असते. अशा तऱ्हेने आत्मा जीवाला ज्या अवस्थेत नेतो, ते दृश्य दाखवितो.





म्हणजेच आत्म्यामुळे अवस्था व अवस्थेमुळे दृश्याचे ज्ञान होते.

**विवरण :**

जीवाच्या दृष्टीने या सृष्टीचे होणारे भान आणि ज्ञान याचे सखोल चिंतन या भावार्थामध्ये दासराममहाराजांनी केले आहे. मानवी देहामध्ये साक्षीभूत चैतन्याची सत्ता आहे. त्यालाच चेतना असे म्हणतात. या चेतनेचे अस्तित्व पायाच्या नखापासून मस्तकापर्यंत शरीरात सर्वत्र निरंतर जागृत असते. जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तिन्ही अवस्थेमध्ये चेतना असते. अवस्थेनुसार चेतना बदलत नाही. या तिन्ही अवस्था जीवाच्या आहेत, चेतनेच्या नाहीत. शरीराच्या/जीवाच्या ह्या अवस्था आलटून/पालटून सतत बदलत असतात. चैतन्य मात्र या तिन्ही अवस्थेमध्ये माळेतील सूत्राप्रमाणे अस्तित्वात असते. हे अवस्थांतर चैतन्याच्या अधिष्ठानावर घडून येत असते. जीवाच्या अवस्था जशा बदलत असतात तसेच, दृश्यातील द्रवरूप, घनरूप व वायुरूप पदार्थामध्येसुध्दा स्थित्यंतर, रुपांतर व अवस्थांतर घडून येत असते. हे सर्व चैतन्याच्या अधिष्ठानावर घडून येते. जीवाच्या ठिकाणी व दृश्याच्या ठिकाणी अशा दोन्हीकडे सतत बदल होत असतो, अवस्था बदलत असतात. त्यामुळेच हे गतीमान जगत् स्थिर वाटते, हे दृश्य खरे वाटते.

या जगात माणसाचे जीवन तीन अवस्थांमधून जात असते. जागृत अवस्थेत शरीर, इंद्रिय व मन इत्यादी कार्यरत असतात. म्हणूनच जीवाला बाह्य जगताचे ज्ञान असते. 'स्वप्न' या अवस्थेत शरीर व इंद्रिये स्तब्ध असतात. या अवस्थेमध्ये फक्त मन हे स्वप्नसृष्टी निर्माण करते. निद्रा या अवस्थेत देह, इंद्रिये व मन या सर्वांचे कार्य थांबलेले असते. याचा अर्थ जशी जीवाची अवस्था असते तशा प्रकारचे ज्ञान, बोध होत असतो. अवस्थांतील फरकामुळे बोधात

फरक पडतो, ज्ञानात फरक पडतो. अवस्थांमध्ये फरक पडत असला तरी दोन्ही अवस्थांमधील असलेल्या चैतन्यात कांहीही फरक पडत नाही. उदाहरणार्थ, स्वप्नामध्ये घाबरलेला माणूस जागा होताच त्याचे भय संपते. स्वप्न अवस्था बदलून त्याठिकाणी जागृत अवस्था येते, ज्ञान बदलते व त्याचे भय संपते. परंतु स्वप्न व जागृति या दोन्ही अवस्थेमध्ये असलेले देहातील चैतन्य कांही बदलत नाही. अवस्था बदलल्याने चैतन्याची अवस्था बदलत नाही.

सर्व अवस्थांमध्ये न बदलणारे चैतन्याचे अस्तित्व म्हणजेच आत्मतत्व जीवाला ज्या अवस्थेत नेते, तसा अनुभव जीवाला येतो. आपण झोपी गेलो की दृश्याचा लय होतो व जागे झालो की तेच दृश्य आपल्या डोळ्यासमोर येते. समजा एक माणूस जागा आहे, एक बेशुध्द आहे, एक झोपेत आहे व एक माणूस मेला आहे. येथे प्रत्येकाचे जग, त्यातील व्यवहार, त्यातील भान व ज्ञान आणि येणारा अनुभव भिन्न स्वरुपाचे असतात. जिवंत माणसाला सृष्टीचा अनुभव येतो पण मृत माणसाला त्या सृष्टीचा अनुभव येत नाही. म्हणजेच सृष्टीचा असण्याचा व नसण्याचा अनुभव अवस्थासापेक्ष असून, निरपेक्ष अशा आत्मचैतन्यामुळे त्याचा अनुभव येतो.

सारांशाने असे म्हणता येईल की, निर्विकल्प, निरपेक्ष अशा चैतन्यरूप आत्मतत्वामुळे जीवाला व सृष्टीतील नाना पदार्थांना अवस्था येत असतात. या अवस्था सतत बदलत असतात आणि जशी अवस्था तसा विश्वाचा अनुभव जीवाला येत असतो.

## २) साधन-साक्षात्कार

स्वत:च्या मूळ स्वरुपाचा शोध घेणारे तत्वज्ञान म्हणजे अध्यात्मशास्त्र होय. अव्यक्त ब्रह्मापासून ही सृष्टी उत्पन्न झाली. प्रथम अव्यक्त तत्व व्यक्त





दशेत आले. नंतर विविधतेने नटलेली ही चेतन-अचेतन सृष्टी उदयास आली. मानव हा चेतनसृष्टीचा एक घटक आहे. अशा प्रकारे अव्यक्त सत्वस्तूपासून मानवापर्यंतचा हा प्रवास आहे. आता आपल्याला जेथून आपण आलो त्या आपल्या मूळ स्वरुपाकडे जावयाचे आहे. पुन्हा आपल्या मूळ निरंजन स्थानाकडे जायचे आहे. हा उलटा प्रवास असून ही परतीची वाटचाल आपण आपल्या जवळ असलेल्या चैतन्यशक्तीच्या सहाय्याने करू शकतो. आपल्या देहात स्थित असलेल्या चैतन्यशक्तीचे नेमके स्वरुप काय आहे हे जाणून घेऊन, मूळ घराकडे घेऊन जाणारी परतीची वाटचाल दाखविणारा हा चिमड संप्रदाय आहे. त्यामुळेच नासदीयसूक्तावरील मांडलेल्या भावार्थामध्ये केवळ बौध्दिक उहापोह नाही. येथे त्या आत्मतत्वाचे प्रत्यक्ष ज्ञान कसे मिळवावे व त्याचा साक्षात्कार कसा करून घ्यावा याविषयी दासराममहाराजांनी, मूलगामी असे अध्यात्मिक रहस्य उलगडून दाखविले आहे.

**साधन-साक्षात्काराविषयी श्रीदासराममहाराजांनी मांडलेल्या भावार्थाचा सारांश (ऋचा १) :**

आपल्या शरीरात निरंतर चालणारे श्वासोच्छ्वास हे अत्यंत महत्वाचे आहेत. सत्-असत् किंवा चैतन्य आणि जड यांचे प्रतीक म्हणजे हे श्वासोच्छ्वास होय. श्वास हा ऊर्ध्वगामी असून त्यामध्ये हलकेपणा व शुध्दत्व असते. चैतन्याचे प्रतीक असणारा श्वास हा ऊर्ध्वगामी असतो. याउलट उच्छ्वास हा अधोगामी असून त्यात जडत्व असते कारण तो चैतन्यापासून सुटलेला असतो. चैतन्यापासून दूर गेल्यामुळेच जीवापुढे मिथ्या असलेली दृश्यत्वाची लाट पसरते. उच्छ्वासामध्ये देहाशी व सभोवतालच्या दृश्याशी आकर्षण निर्माण होते.

अशा या श्वासोच्छ्वासाच्या/प्राणापानाच्या निरोधाने इडा व पिंगला सुषुम्नाकार होतात आणि केवलकुंभकाची अवस्था प्राप्त होते. येथे चैतन्याच्या सूक्ष्मतम लहरी पसरलेल्या असतात. ही दिक्-काल आणि आकाश यांच्या पलीकडे असलेली स्थिती होय. हेच आपले खरे विशुध्द जीवन होय. या केवलकुंभक काळातच द्रष्ट्याची/आत्मतत्वाची ओळख होते. सुषुम्नाकार झालेल्या ऊर्ध्वगामी जीवनाचा परिणाम म्हणून आत्मदर्शनाचा लाभ होतो. चैतन्य प्रकट होते व त्यामुळे डोळ्यासमोर थैमान घालणाऱ्या दृश्याचा लय होतो. जडसृष्टीच्या ऐवजी चैतन्यमय सृष्टीचा अनुभव येतो, असा जीव चैतन्याशी तद्रूप झाल्याने तो आनंदरुपाचा अनुभव घेत राहतो.

**विवरण :**

श्वासोच्छ्वासाच्या व केवलकुंभकाच्या साधनाद्वारे जीवाचा शिव होतो. दासराममहाराजांच्या भावार्थातून हाच विषय स्पष्ट केला आहे. जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांच्या बुडाशी जी चैतन्याची अवस्था आहे तिच्यात राहणे म्हणजे 'साधन' होय. यामध्ये देहाचे विस्मरण आणि केवळ चैतन्याच्या स्मरणाची अवस्था असते. या तिन्ही अवस्थामध्ये चैतन्याच्या अधिष्ठानावरती देहामध्ये श्वासोच्छ्वासाची क्रिया निरंतर चाालू असते. श्वासोच्छ्वास ही चैतन्याची सहजक्रिया आहे. चैतन्यामुळे/मुख्य प्राणामुळे श्वसनाची क्रिया होत असते आणि श्वसन क्रियेमुळे शरीरयंत्रणा कार्यान्वित होऊन देहाचे व्यवहार, व्यापार सुरु होतात. श्वसनाचा आणि चैतन्याचा असा निकटचा संबंध असल्याने श्वसनाच्या अभ्यासाने 'चैतन्यआत्मा' लक्ष होणार आहे. गुप्त असलेला आत्मा देहामध्ये प्रकट होणार आहे. चिमड संप्रदायाचे साधन श्वासोच्छ्वासाशी संबंधित आहे. देहभाव विरल्याशिवाय साक्षात्कार





नाही. श्वासोच्छ्वासाचे साधनाने देहभाव विरून साक्षात्कार होतो. चैतन्याचा रोकडा साक्षात्कार करून देणारे हे परिपूर्ण साधन आहे.

चैतन्यतत्व/प्राणतत्व हे मनुष्याच्या श्वसनक्रियेस कारणीभूत आहे. या चैतन्यतत्वाला/प्राणतत्वालाच आत्मतत्व म्हणतात. प्राण व आत्मा एकच आहेत. प्राण म्हणजे आत्मदेव होय. मनुष्याच्या व सर्व जगताचा मूलाधार 'प्राण' होय. प्राण आहे तोवरच शरीर जिवंत राहते. जोपर्यंत श्वास चालू आहेत, तोवरच शरीरात प्राणाचे अस्तित्व असते. म्हणूनच श्वासोच्छ्वास ही जीवाच्या जिवंतपणाची ओळख आहे. अखंडपणे गतिरूप असलेल्या श्वासोच्छ्वासावरून मनुष्याचे आयुष्य मोजले जाते. श्वसनाचा आणि शब्दब्रह्माचा निकटचा संबंध आहे. ध्वनीच्या विशिष्ट कंपन अवस्थेला अक्षर म्हणतात. हे अक्षर म्हणजे विशिष्ट असा आकृतिबंध असतो. ध्वनीच्या विशिष्ट कंपनाला श्वसनाचे सहाय्य लागते. त्यामुळे ध्वनि-कंपन-अक्षर व पुढे शब्द अशी प्रक्रिया सुरु होते. त्यामुळेच श्वसनाला शब्दाचा प्राण म्हटले जाते.

अशा या श्वासोच्छ्वासाचे, साधनेमध्ये महत्वाचे स्थान आहे. श्वसनाचा आणि मनाचा निकटचा संबंध आहे. आपले मन जेव्हा क्षुब्ध असते, विकारवश असते तेव्हा नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण वाढलेले दिसते. श्वसन हे मनाची गति नियंत्रित करणारे साधन आहे. जितके नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण जास्त तितकी दृश्याची जाणीव वाढते. शरीर व भोवतालचे जग मिळून दृश्य बनते. देहाची वाढणारी जाणीव म्हणजेच देहाची आसक्ति वाढते व त्यामुळेच देह म्हणजेच मी हा देहभाव दृढ होतो. देहावस्थेमध्ये भोवतालचे जग, रात्र-दिवस, दिक्-काल यांची रसरशीत जाणीव जीवाला होत असते. असा जीव चैतन्याला विन्मुख होऊन जडाशी समरस होतो. चैतन्याला विन्मुख होऊन जे जडाशी समरस होतात ते सारे 'जडवादी' होत. दृश्यामधून सुख

मिळेल या आशेपोटी दृश्याशी/जडाशी आसक्त होणारे, सतत सुखदु:खाच्या फेऱ्यात अडकतात व आत्मसुखाला वंचित होतात.

शरीराचे आकर्षण असणे म्हणजे अधोगती असणे होय. दृश्याची/देहाची जाणीव जितकी जास्त, तितके श्वास/जीवन अधोमुखतेने वाहू लागते. यामुळे जीव व चैतन्य यामधील वेगळेपणाचे अंतर वाढत जाते. जीवाची दृष्टी शरीरावर व बाहेरील जगतावर असल्याने तसेच श्वसनावरती जडाचे गुरुत्वाकर्षण असलेने वर गेलेला श्वास खाली येतो. चैतन्याच्या आकर्षणामुळेच खाली आलेला श्वास वर जातो. चैतन्याचे आकर्षण जडाच्या आकर्षणापेक्षा जास्त होण्याची कळ साधणे म्हणजे 'साधन' होय. नि:श्वासाला प्रमाण येणे हे साधनेमध्ये अत्यंत आवश्यक आहे.अभ्यासाने नि:श्वासाचे प्रमाण कमी होऊ लागले की साधनेमध्ये अनुभव येऊ लागतात. दासरामगाथेतील सदानंदपाठातील एका अभंगामध्ये श्रीदासराममहाराजांनी नि:श्वासाचे प्रमाण कमी होण्याने येणाऱ्या अनुभवाचे सविस्तर वर्णन केले आहे. या अभंगामध्ये म्हटले आहे,

''एकचि अंगुळ वहाता नि:श्वास ।
होय नाद-घोष सुस्वरेसी ।।-''

नि:श्वास एक अंगुळ खाली वाहू लागतो तेंव्हा नादश्रवण होते असे येथे म्हटले आहे.

नादश्रवण हे लयाचे उत्तम साधन आहे. नादानुसंधानाने मन व प्राण यांचा लय होऊन आत्मा लक्ष होणार आहे. नि:श्वासाचे प्रमाण एक अंगुळे येते तेंव्हा नादश्रवण घडून केवळकुंभकाची प्राप्ती होते. याचे कारण म्हणजे नादश्रवण व केवलकुंभक यांच्यामध्ये 'फलबीजन्याय' संबंध आहे. नाद व





केवलकुंभक एकरूप आहेत. नादश्रवणाने उत्तम केवलकुंभक साधतो व केवलकुंभकाने नादश्रवण एकाग्रतेने होते. हे दोन्ही परस्परांना उपकारक आहेत. यांची एकमेकांना मदत होते. नादश्रवणाने श्वसन बंद पडते व मन निर्विकार होते. अशा तऱ्हेने श्वसनाचा लय हा नादाच्या आश्रयाने होत असल्याने केवलकुंभकाची सिध्दी आपोआपच होते. केवलकुंभक ही श्वास व नि:श्वास यांच्या दरम्यानची स्थिती आहे. अनियमितपणे कसेही वाहणारे श्वासोच्छ्वास हे केवलकुंभकाने बंद होतात. केवलकुंभकाचा अभ्यास हा नादानुसंधानयुक्त आहे. केवलकुंभक ही श्वासोच्छ्वास थांबण्याची आपोआप होणारी एक अवस्था आहे. या अवस्थेत मन व शरीर पूर्णपणे शांत होते. अशा तऱ्हेने साधनेच्या योगाने आधी नादश्रवण अगर साधनेच्या योगे आधी केवलकुंभक यापैकी कांहीही प्रथम साधले असता दुसऱ्याची प्राप्ती आपोआप होते.

श्वास व नि:श्वास या दोन्ही क्रिया बंद झाल्याने केवलकुंभकरूपी प्राणाची स्थिती अनुभवास येते. केवलकुंभक साधण्याने प्राण हाताशी येतो. नादानुसंधानयुक्त केवलकुंभकाचा अभ्यास वाढविला असता मनाला स्थैर्य प्राप्त होते. इडा व पिंगला नाड्यातून वाहणारा प्राण सुषुम्ना नाडीत खेचला जाऊन तो ऊर्ध्वगामी वाहू लागतो. साधनेच्या अभ्यासाने हा प्राण ब्रह्मरंध्रात लीन झाल्यावर स्थिर झालेले मनही लीन होते व निर्विकल्पता प्राप्त होते. पुढे जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांच्या पलीकडील महाकारण देहामधील 'तुरीया' अवस्थेमधील साक्षीचैतन्य आत्म्याचा साक्षात्कार होतो. तुर्येमधील साक्षीभावाचा येणारा अनुभवही जेंव्हा मुरून जातो तेंव्हा नि:शब्द अशी उन्मनी अवस्था प्राप्त होते.

नादश्रवणाने केवलकुंभक कसा साधला जातो हे पाहिले. परंतु

केवलकुंभक साध्य झाल्यानंतर नादश्रवणाचे कार्य संपत नाही. कारण नादानुसंधान हे प्राण व मन यांच्या लयाचे साधन आहे. सुषुम्नेतील ऊर्ध्वमुखी प्राणाचा प्रवासही नादश्रवणयुक्त आहे. महाकारण देहामध्ये याच अनाहताचा बिंदू , कला व ज्योती अशा प्रकाशरूपात आविष्कार होतो. नाद, बिंदू, कला व ज्योती ही सर्व चैतन्याची मूलतत्वे आहेत. त्यामुळे साधन-साक्षात्काराच्या प्रक्रियेत नादश्रवण सर्वत्र अनुस्यूत आहे. सारांशाने असे म्हणता येईल की नादानुसंधान हे आत्म्याचेच अनुसंधान होय. त्यामुळेच या संप्रदायामध्ये नादश्रवणाला खूप महत्व आहे. नादश्रवणामध्ये तदाकार होण्याला साधनेमध्ये एक महत्वाचा टप्पा मानला जातो. नाद म्हणजे नाम. त्यामुळे नादश्रवण म्हणजे नामस्मरण होय. येथे साध्य व साधन एकच आहे. म्हणून चैतन्यरूप नामाच्या स्मरणाने चैतन्याचा साक्षात्कार होणे हे स्वाभाविक आहे.

केलवकुंभक काळात आत्मतत्वाची ओळख होते. ही दिक्, काळ यांच्या पलीकडील अवस्था आहे. देहाचे आयुष्य श्वासोच्छ्वासाची गती / प्राणापानाच्या गतीमुळे हळूहळू संपत असते. केवलकुंभकात श्वसनाची गती थांबलेली असते. त्यामुळे काळाचे चक्रही थांबते आणि आयुष्याचा क्षयही थांबतो. चैतन्याच्या अवस्थेत आपली स्वतंत्र जाणीव रहात नसल्याने सापेक्षता रहात नाही. त्यामुळे देह, काळ व वस्तू यांचे स्वतंत्र भान रहात नाही आणि त्यामधील भेद मावळतो.

अवस्था बदलली की ज्ञान बदलते. जीवात्म्याला शिवात्म्याची अवस्था प्राप्त होते. ही निर्विकल्प अवस्था होय. त्यामुळे भोवतालच्या जगाविषयीचे ज्ञानही बदलते. कल्पना करणाऱ्या मनाच्या अस्तित्वावर जागृति व स्वप्न या अवस्था प्राप्त होतात. कल्पनेमुळे हे जग दिसते व खरे वाटते. परंतु निर्विकल्प अवस्थेत जगाचा अनुभव येत नाही. तर निर्विकल्प आत्मवस्तूचाच





केवळ अनुभव येतो. अंतर्यामी प्रकट झालेले चैतन्य बाहेरही प्रकट होते व दृश्याचा आभास मावळतो. जगतामध्ये सतत घडत असलेली उत्पत्ति, स्थिती आणि लय ही क्रिया म्हणजे आत्मसत्तेची क्रिडा वाटते आणि चैतन्याशी तदाकारता प्राप्त झाल्याने आनंदाची प्राप्ती होऊन धन्यतेचा लाभ होतो.

## ३) श्रीदासराममहाराजांच्या भावार्थाची वैशिष्ट्ये

वेद व उपनिषदांना तत्वज्ञानातील नवनीत मानले जाते. प्राचीनकाळी प्रज्ञावंत ऋषींच्या अंत:करणात स्फुरण पावलेले हे ज्ञान आहे. असे प्रकट झालेले ज्ञान, वेद व उपनिषदांमध्ये अक्षररूपातून आलेले आहे. म्हणूनच खऱ्या अर्थाने हे ज्ञान अपौरुषेय व अक्षर मानले जाते. अक्षर वाङ्मय ते, की जे काळाच्या प्रवाहातही काळावर मात करून नित्यनूतन राहते. वेद-उपनिषदे हे अशाप्रकारचे वाङ्मय आहे. ते आजही नित्यनूतन वाटते याचे कारण म्हणजे त्यात असलेले चिरंतन स्वरुपाचे विषय आणि त्यामध्ये असलेले शाश्वत स्वरुपाचे तत्वज्ञान होय.

नासदीयसूक्त हा सर्व वेदांचा गाभा आहे .अशा या नासदीयसूक्तावर आपल्या चिमड संप्रदायातील साधनेला अनुसरून कांही भाष्य लिहावे अशी इच्छा श्रीदासराममहाराजांच्या अंतरंगातील डॉ. के. वा. आपटे यांनी श्रीदासराममहाराजांकडे व्यक्त केली. डॉ. के. वा. आपटे यांनी श्रीदासराममहाराजांना या नासदीयसूक्तातील ऋचांचा अन्वयार्थ दिला. त्यावरती श्रीदादांनी (श्रीदासराममहाराजांनी) सन १९६८ साली भावार्थ लिहून दिला. श्री. पां. सी. गोखले यांनी श्रीमामामहाराज केळकर यांचे जन्मशताब्दीनिमित्त हा ग्रंथ २७ फेब्रुवारी १९८८ ला प्रकाशित केला.

या भावार्थामध्ये एकमेव अशा आत्मतत्वापासून ही सृष्टी कशी निर्माण

झाली हे सांगून त्या आत्मतत्वाचे यथार्थ स्वरुप विशद केले आहे. त्यामध्ये मुख्यत: सृष्टीचे स्वरुप, सृष्टीमधील जीवाचे स्थान व स्वरुप व त्याचा सृष्टीनिर्मात्याशी व या जगाशी असलेला संबंध असे विषय आलेले आहेत. श्रीदासराममहाराजांनी या सूक्तावरील केलेली भावार्थाची मांडणी वैशिष्ट्यपूर्ण स्वरुपाची आहे. यामध्ये केलेल्या विवेचनामध्ये कोशांचा आधार घेऊन त्यानुसार ऋचांच्या अन्वयार्थाचा भावार्थ मांडलेला नाही किंवा नासदीयसूक्तामध्ये असलेल्या ऋचांचे स्पष्टीकरण, पूर्वपक्ष-उत्तरपक्ष, सिध्दांत अशा प्रकारानेही केलेले नाही. दासराममहाराजांनी येथे सूक्तामध्ये असलेल्या ऋचांचा केवळ अनुवाद केलेला नाही तर आशयाचा मूळ गाभा कायम ठेवून संप्रदायाच्या तत्वज्ञानाच्या उद्दिष्टाला अनुरूप असे भाष्य केले आहे. ऋचेमध्ये असलेले शब्द व त्यांचा नेमका अर्थ सांगणे हा श्रीदासराममहाराजांच्या भाष्याचा हेतू अथवा प्रयोजन नाही. म्हणूनच श्रीदासराममहाराजांनी त्यातील विषयांची संगती कायम ठेवून स्वंतत्र भावार्थ मांडलेला आहे. विश्वनिर्मितीसारखा गूढ आणि व्यापक विषय मांडताना विद्वानांनी त्यातील शब्दांचे भिन्न भिन्न अर्थ केलेले आहेत. परंतु अर्थापेक्षा आशय समजावून घेणे महत्वाचे आहे. यानुसार त्यामधील सत्-असत्, तपस: सारख्या अर्थगर्भ शब्दाचा श्रीदासराममहाराजांनी केलेला भावार्थ वैशिष्ट्यपूर्ण असा आहे.

भगवान श्रीसद्गुरु निंबरगीकरमहाराज यांचेपासून चालत आलेला चिमड संप्रदाय हा वेदप्रणीत असून त्याला वेदातील सूक्तांचा पायाभूत आधार आहे. ऋग्वेदातील नासदीयसूक्तात आलेले विषय हे चिमड संप्रदायाच्या तत्वज्ञानाचे पायाभूत विषय आहेत. चिमड संप्रदायाचे तत्वज्ञान हे मुख्य सूत्र धरून केलेला हा भावार्थ आहे. असे करताना सूक्ताची केवळ तर्काच्या





आधारे किंवा ज्ञानाच्या पातळीवर संगती लावलेली नाही. चिमड संप्रदाय हा स्वरुप संप्रदाय आहे. त्यामध्ये स्वरुपाचा रोकडा साक्षात्कार होण्याला अत्यंत महत्व आहे. त्यामुळे आपण ब्रह्म आहो असा केवळ बुध्दीचा निश्चय उपयोगाचा नाही. अद्वैताच्या/स्वरुपाच्या प्रत्यक्ष अनुभवाचा मार्ग दाखविणारा हा चिमड संप्रदाय आहे. केवळ बौध्दिक मार्गाचा अवलंब न करता सहजसाधनेने असा रोकडा साक्षात्कार कसा करून घेता येतो याबद्दलचे विवेचन या भावार्थामध्ये आलेले आहे. वरील पार्श्वभूमीवर श्रीदासराममहाराजांच्या भावार्थाची कांही वैशिष्ट्ये पाहू.

**श्रीदासराममहाराजांच्या भावार्थाची वैशिष्ट्ये :**

१. देहबुध्दीतून तर्काच्या सहाय्याने केलेले हे लिखाण नसून त्याला आत्मानुभवाचा भक्कम पाया आहे. श्रीदासराममहाराजांचा भावार्थ म्हणजे परतत्वाचा, स्वानुभवाचा आविष्कार आहे.

२. श्रीदासराममहाराजांची अनुभवसृष्टी चिद्विलासवादाची आहे. सर्व सृष्टी हा केवळ चैतन्याचाच विलास आहे. अशा चैतन्याच्या सामर्थ्याचे नेमके भान या भावार्थामधून अनुभवाला येते.

३. जीव विश्वाकडे कोणत्या दृष्टीने पाहतो व त्याने विश्वात्मक परमेश्वराकडे पाहण्यासाठी कोणते साधन आचरणात आणावे याचे मार्गदर्शन येथे केले आहे. विश्वाकडे अध्यात्मिक दृष्टीने कसे पहावे याचे दिग्दर्शन येथे केले आहे.

४. या भावार्थामध्ये आलेले तत्वज्ञान केवळ बौध्दिक पातळीवरून न पाहता त्याला अनुभवाच्या कक्षेत आणले आहे. जगण्याच्या संदर्भातून यातील तत्वज्ञानाची मांडणी केली आहे.

५. श्वासोच्छ्वास, केवलकुंभक, नादानुसंधान अशा साधनेतील महत्वाच्या विषयांची अनुभवसिध्द उकल यात झालेली आहे.

६. ग्रंथाच्या शेवटी सद्गुरु व गुरुपरंपरा यांच्याविषयीचा एकनिष्ठ भाव व श्रीदासराममहाराजांनी व्यक्त केला आहे. या भावार्थाचे सारे श्रेय त्यांनी गुरुकृपेला दिले आहे.

७. नासदीयसूक्तावरील असा हा ग्रंथ परमार्थमार्गावरील पांथस्थाला मार्गदर्शक ठरणार आहे. ज्यांना सद्गुरु श्रीदासराममहाराजांच्या या भावार्थाचे समग्र दर्शन होईल त्यांना आत्मसाक्षात्काराचा लाभ निश्चित होईल यात शंका नाही.





## संदर्भग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | नासदीय सूक्त भाष्य | शंकर रामचंद्र राजवाडे (अहिताग्नि राजवाडे) |
| २. | भारतीय संस्कृती कोश | पं. महादेवशास्त्री जोशी |
| ३. | भारतीय तत्वज्ञान | श्रीनिवास दीक्षित |
| ४. | उपनिषद्रहस्य | गुरुदेव रा. द. रानडे |
| ५. | सुबोध योगवसिष्ठसार | पं. पुरुषोत्तमशास्त्री अर्वीकर |
| ६. | दिव्यामृतधारा (भाग १ ते ४) | बाबामहाराज अर्वीकर |
| ७. | हिंदुधर्म – विश्वधर्म | गणपतराव जांबोटकर |
| ८. | श्रीदासरामगाथा | प्रकाशिका सौ. श्यामला कृ. पटवर्धन |
| ९. | परमार्थ प्रश्नोत्तरी | संपादक : डॉ. के. वा. आपटे |
| १०. | दासराममहाराज चरितामृत | डॉ. के. वा. आपटे |
| ११. | ज्ञान आणि बोध | डॉ. के. वा. आपटे |
| १२. | श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | संपादक : डॉ. के. वा. आपटे |
| १३. | दासरामगौरवग्रंथ | प्रकाशक धनंजय भावे |
| १४. | श्रीशंकराचार्य विरचित योगतारावली | |
| १५. | श्रीदासराममहाराजकृत रेवणसिध्दपाठ : विवरण | डॉ. के. वा. आपटे |